जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जलवाहिनी फुटली, उंचच उंच उडाला पाण्याचा फवारा; १२ एकर क्षेत्र पाण्याखाली, लाखो लिटर पाणी वाया

नगर - चार तालुक्यातील ४३ गावांत १०२ पाझर तलाव भरून सुमारे साडेतीन हजार हेक्टर क्षेत्राला वरदान ठरलेली, वांबोरी चारी ४ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे चारीवर रब्बीसह उन्हाळी पिकांची भिस्त असते. ९ फेब्रुवारीला दुपारी एकच्या सुमारास राहुरी तालुक्यातील धामोरी खुर्द येथे अचानक मोठा आवाज होऊन, १८०० एमएम व्यासाची जलवाहिनी फुटली. एकाचवेळी तीन पंपांचा फ्लो असल्याने ३० फुट उंचीवर पाण्याचा फवारा उडाला. या घटनेत परिसरातील सुमारे दहा ते बारा एकर क्षेत्रात पाणी जाऊन नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तासाभरात सुमारे १.१ लाख लिटरहून अधिक पाणी वाया गेले.

वांबोरी चारीद्वारे जिल्ह्यातील राहुरी, नगर, पाथर्डी आणि नेवासा या तालुक्यातील सुमारे ४३ गावांतील पाझर तलाव भरून घेतले जातात. मुळा धरणाचे पाणी, ज्या भागाला प्रवाही कालव्याने मिळत नाही, अशा अवर्षणप्रवण भागासाठी ही चारी वरदान आहे. जलवाहिनी फुटल्यामुळे सुमारे १२ गुंठे रान वाहून गेले असून, १२ एकरावर क्षेत्र पाण्याखाली गेले. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. दरम्यान मुळा विभागाच्या टिमने घटनास्थळी पाहणी केली.


वांबोरी चारीची जलवाहिनी राहुरी तालुक्यातील धामोरी खुर्द येथे फुटल्याने उडत असलेला पाण्याचा फवारा.

वांबोरी चारी सुरू केल्यानंतर टप्प्याटप्प्याने तीनही पंप सुरू केले जातात. ११०० अश्वशक्तीचे तीन पंप असून, एका पंपातून सुमारे २५ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग होतो. त्यानुसार तीन पंपातून ७५ क्युसेक वेगाने पाणी बाहेर पडते. वांबोरी चारीसाठी ६८० दशलक्ष घनफूट पाणी सोडायचे आहे.

### १५ वर्षे जुनी लाईन असल्याने फुटली

जलवाहिनी फुटल्याची माहिती मिळताच, तत्काळ पंप बंद करण्यात आली. ही लाईन १५ वर्षे जुनी आहे. त्यामुळे ती फुटली असावी. पाणी आटण्यासाठी दोन ते तीन दिवस लागतील. त्यानंतर प्रत्यक्ष दुरूस्ती पूर्ण होण्यासाठी सात दिवस लागू शकतील. योजनेची जलवाहिनी १५ वर्षे जुनी आहे. नुकसानीची आम्ही पाहणी करणार आहोत. असे मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी सांगितले.

### मक्याचे उभे पीक मातीमोल

माझ्या शेतात यापूर्वीही लाईन फुटली होती. आता पुन्हा त्याच ठिकाणी फुटली, त्यामुळे माझे १२ गुंठे रान वाहून गेले. माझे मकाचे उभे पीक मातीमोल झाले. परिसरात गुडघ्यापेक्षा जास्त पाणी होते. परिसरात १२ एकरापेक्षा अधिक नुकसान झाले आहे. हा त्रास कायमचा आहे, भरपाई दिली नाही तर काम करू देणार नाही. अशी भूमिका शेतकरी लक्ष्मण सखाराम उगले यांनी मांडली.

## गामा भागानगरे खुन प्रकरणातील आरोपी संतोष सरोदे याचा मृत्यू

नगर - नगर शहरातील ओंकार उर्फ गामा भागानगरे खुन प्रकरणातील संशयित आरोपी बबलू उर्फ संतोष अविनाश सरोदे (वय ४७, रा.जाधवमळा, बालिकाश्रम रोड) याचा १० फेब्रुवारी रोजी सकाळी खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला आहे.



बालिकाश्रम रस्त्यावर जाधव मळा परिसरात १९ जून २०२३ रोजी मध्यरात्री ओंकार उर्फ गामा भागानगरे याचा तलवारीने वार करत खुन करण्यात आला होता. या खुन प्रकरणात गणेश केरूप्पा हुचे, नंदू बोराटे, संदीप गुडा, सागर गुडा, रवी नामदे, वैभव हुचे, अनिकेत साळुंके, ओम हुचे आणि बबलू उर्फ संतोष सरोदे या आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. यातील बबलू सरोदे याला काही दिवसांपूर्वी न्यायालयाने जामीन मंजूर केला होता.

तो जामिनावर बाहेर असताना त्याला गंभीर आजाराने ग्रासले होते. त्यामुळे त्याच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचार घेत असताना १० फेब्रुवारी रोजी सकाळी त्याचा मृत्यू झाला. त्याच्यावर दुपारी नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात १ भाऊ, भावजय, २ बहिणी असा परिवार आहे.

## मोहन टेके यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - सावतानगर भिंगार येथील रहिवासी मोहन बापू टेके (वय ८०) यांचे १० फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## गोरख ठोंबरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सातभाई गल्ली, दिल्लीगेट येथील रहिवासी गोरख गोविंद ठोंबरे (वय ६७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १० फेब्रुवारी रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ४ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे.


वसंत टेकडी येथील नित्यसेवा सोसायटीतील विहिरीत मासे मृतावस्थेत आढळून येत आहे. (छाया - विजय मते)

# नित्यसेवा सोसायटीमधील विहिरीत मासे मृतावस्थेत

नगर - वसंत टेकडी येथील नित्यसेवा सोसायटीमधील विहिरीत मासे मृतावस्थेत आढळून येत असल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. विडी कामगारांची सोसायटी म्हणून ओळख असलेली नित्यसेवा सोसायटीत ही विहीर आहे. नगरपालिकेची पाणी व्यवस्था नसताना या विहिरीचे पाणी पूर्वी पिण्यासाठी परिसरातील नागरिक वापरत होते. आता प्रत्येकाच्या दारात नळ आल्याने पिण्याचे पाणी मुबलक असल्याने या विहिरीचा वापर सांडपाणीसाठी होत आहे.

गेल्या दोन दिवसांपासून २०० ते ३०० मासे मृता अवस्थेत आढळून येत असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहे. स्थानिक तरुणांनी मृत मासे बाहेर काढून स्वच्छता करण्याचा प्रयत्न केला तरीही आज सकाळी पुन्हा मासे मृतावस्थेत आढळून आले. पाण्याची तपासणी करण्यासाठी पाण्याचा नमुना प्रयोग शाळेत पाठविला असून रिपोर्ट यायला १५ दिवस अवघी लागणार असल्याने तोपर्यंत विहिरीचे पाणी कुणी वापरू नये असा मेसेज तरुणांनी सोसायटीतील लोकांना केला आहे. रिपोर्ट आल्यानंतरच माशांचा मृत्यू कशामुळे झाला समजेल.

# आता नगरच्या नवीन लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तरी दिवे लावावेत

*(पुढील मजकूर पान २ वर)*

रस्त्यावर खड्डेच होऊ नयेत, झाले तरी ताबडतोब दुरुस्त व्हावेत, यासाठी समिती निर्माण केली असती तर चांगले झाले असते आणि मुख्य म्हणजे हे सर्व करताना रस्त्यावरचे लाईटच अस्तित्वातच नसणे, हे किती गंभीर आहे, याचा का विचार केला जात नाही ?

या अंधारामुळे भटके कुत्रे, नको असलेले स्पीड ब्रेकर आणि रस्ते बनवताना मधून-मधून विद्वान अशा कॉन्ट्रॅक्टरने रस्त्याची तोंडे एकमेकांना जोडताना मध्ये मध्ये सोडून दिलेले मोठमोठे पॅचेस.. जे आता पुन्हा उभ्या आयुष्यात पूर्ण होतील की नाही, याची गॅरंटी नाही. असे ऐतिहासिक पॅचेस पाहयचे असतील तर आपला मार्केट यार्ड चौक, त्यानंतर गंगा उद्यानाच्या अलीकडील भाग, या ठिकाणचे कॉन्ट्रॅक्टरने सोडून दिलेले प्रेक्षणीय पॅचेस पहावेत. या सर्व गोष्टींमुळे एमआयडीसीमध्ये काम करणारे कामगार तसेच उपनगरामध्ये राहणारे काही ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी या सर्वांना रात्रीच्या वेळेस जीव मुठीत घेऊनच हाय-वे वर चालावे लागत आहे. जिल्हा नियोजन समितीकडे कोट्यावधी रुपये येतात. अशा समस्यांकडे दुर्लक्ष करून त्याचा नेमका काय विनिमय होतो, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

निवडणूक काळात एखादा मोठा मंत्री सभा घ्यायला येणार असेल तर तिथे अगदी आचारसंहिता चालू असताना सुद्धा रात्रीतून लाखो रुपये खर्चून रस्ता दुरुस्त होतो. सगळीकडे चकचक स्वच्छता होते लखलखाट होतो, अशा कामासाठी कुठून रात्रीतून मंजुरी घेतली जाते आणि कसा निधी उपलब्ध होतो, ते साक्षात परमेश्वरालाच माहिती.

या सर्व पार्श्वभूमीवर या अगोदर 'प्रशासक राज' मुळे समाजसेवकांना, नगरसेवकांना काही काम करता आले नाही, असे समजले तरी तब्बल २५ महिन्याचे प्रशासक राज संपून आता लोकनियुक्त प्रतिनिधींचे राज्य मनपामधे सुरू होत आहे, म्हणून नगरकरांना 'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश' हे गाणं म्हणायची संधी द्यावी आणि समाज विकासकामे केल्यामुळे व लोकप्रियतेमुळे प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या नवीन लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी आता तरी पहिले शुभशकुनी काम म्हणून जसे आपण शुभारंभ करताना आपण दीपप्रज्वलन करत असतो, तसे सर्वांनी आपापल्या प्रभागात दिवे लावावेत, अशी अपेक्षा आहे. यासाठी नगर विकास खात्याने तसेच जिल्हा नियोजन विकास निधी देताना या नवीन लोकनियुक्त लोकप्रतिनिधींना प्रथम दिवे लावण्यासाठी तातडीने निधी द्यावा आणि त्या निधीचा उपयोग फक्त दिवे लावण्यासाठीच व्हावा, असे जागरुक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, नगर विकास, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, आयुक्त अहिल्यानगर महानगरपालिका यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

'न्यू आर्टस'चे माजी प्राचार्य

## डॉ. विद्याधर औटी यांचे निधन

नगर - अहिल्यानगर येथील न्यू आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विद्याधर भास्करराव औटी (वय ८१) यांचे ९ फेब्रुवारी रोजी सकाळी पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत त्यांनी पारनेर व अहिल्यानगर येथे प्राचार्य म्हणून काम केले होते.



पारनेरचे माजी आमदार कॉ. भास्करराव औटी यांचे पुत्र तर विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांचे ते मोठे बंधू होत. औटी यांनी कम्युनिस्ट विचारांचा वारसा अत्यंत निष्ठेने जपला पारनेर तालुक्यात सामाजिक सलोखा टिकावा, यासाठी डॉ. औटी यांनी नेहमीच पुढाकार घेतला.

'सावित्री-फातिमा विचार मंचा'च्या स्थापनेत त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. अंधश्रद्धा, प्रतिगामी विचार आणि जातीय-धार्मिक वातावरण पेटविण्याविरूद्ध त्यांनी संघर्ष केला. एक आदर्श शिक्षक, प्रशासक आणि लढाऊ कार्यकर्ता अशी त्यांची ओळख होती. त्यांच्यावर दुपारी वानवडी, पुणे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## प्रभाकर देशपांडे यांचे वृद्धाकाळाने निधन

नगर - सावेडीमधील बिल्वदल (पोलिस) कॉलनीतील रहिवासी प्रभाकर माधव देशपांडे (वय ९२) यांचे ९ फेब्रुवारी रोजी रात्री वृद्धापकाळामुळे निधन झाले. १० फेब्रुवारी रोजी सकाळी त्यांच्या पार्थिवावर नालेगावातील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन जावई, एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. प्रभाकर देशपांडे हे सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक होत.



## सुभाष साठे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका सुरक्षा रक्षक कर्मचारी सुभाष बाजी साठे (५८) यांचे ७ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार त्यांच्या मूळ गावी मु. पो. पेड ता. तासगाव जिल्हा सांगली येथे करण्यात आले. ते माजी सैनिक होते, त्यांनी कारगिल युद्धात सेवा बजावली होती. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



## समाबाई बेरड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - खडकी येथील रहिवासी समाबाई पंढरीनाथ बेरड (वय ८७) यांचे ९ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मिनीनाथ बेरड यांच्या त्या मातोश्री होत.

# 'सुरक्षित इंटरनेट' या विषयावर व्यापक स्वरूपात जागृती करा

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच आवाहन; जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुरक्षित इंटरनेट दिन' साजरा

नगर - इंटरनेटचा वापर वाढत असताना त्याचा सुरक्षित, सजग आणि जबाबदार वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, वैयक्तिक माहितीचा गैरवापर तसेच डिजिटल माध्यमांवरील चुकीची माहिती यासारख्या बाबींचा धोका वाढत असल्याने, याबाबत व्यापक स्वरूपात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले.


इंटरनेटच्या सुरक्षित व जबाबदार वापराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुरक्षित इंटरनेट दिन' साजरा करण्यात आला.

इंटरनेटच्या सुरक्षित व जबाबदार वापराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुरक्षित इंटरनेट दिन' साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात इंटरनेट हे शिक्षण, व्यवसाय, सेवा-सुविधा तसेच दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. मात्र, इंटरनेटचा वापर करताना योग्य दक्षता न घेतल्यास नागरिक सायबर फसवणूक, बनावट संदेश, फिशिंग, हॅकिंग, सोशल मीडियाचा गैरवापर यासारख्या प्रकारांना बळी पडू शकतात. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

यावेळी जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे म्हणाले, जनमानसांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित व जबाबदार वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी 'सुरक्षित इंटरनेट दिन' हा दिवस जगभरात साजरा करण्यात येतो. इंटरनेट वापरताना उद्भवणाऱ्या नवनवीन समस्या, सायबर गुन्ह्यांचे प्रकार, ऑनलाइन धोके व डिजिटल माध्यमांवरील सध्याच्या चिंतांबाबत जनजागृती करणे हा यामागील उद्देश आहे.

इंटरनेटचा उपयोग सर्वच क्षेत्रांमध्ये माहिती मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र, इंटरनेटवरून येणारे अनोळखी कॉल, बनावट लिंक, फसवे संदेश, सोशल मीडियावरील चुकीची माहिती, ऑनलाइन खरेदीतील फसवणूक, तसेच डिजिटल माध्यमांवरून आर्थिक व्यवहार करताना होणारी फसवणूक यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, अनोळखी व्यक्तीला वैयक्तिक माहिती न देणे, ओटीपी किंवा पासवर्ड कोणासही न सांगणे, तसेच अधिकृत संकेतस्थळे व प्सचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ई-बँकिंग, यूपीआय व्यवहार, ऑनलाइन पेमेंट, इंटरनेट बँकिंग करताना विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे असून, सुरक्षित पासवर्ड वापरणे, वेळोवेळी पासवर्ड बदलणे, दोन-स्तरीय सुरक्षा कार्यान्वित करणे, तसेच व्यवहारांची नियमित तपासणी करणे उपयुक्त ठरत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना इंटरनेटवरील सुरक्षितता, सोशल मीडिया वापरातील दक्षता, डिजिटल फसवणुकीपासून बचाव आणि सायबर तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी इंटरनेट वापराच्या सुरक्षिततेची शपथही उपस्थितांना देण्यात आली.

कार्यक्रमास विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नगरमध्ये ११ फेब्रुवारी रोजी 'जागेवर निवड संधी' उपक्रम

नगर - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी 'जागेवर निवड संधी'उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

हा उपक्रम ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टी.व्ही. सेंटरजवळ, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या उपक्रमात एनसाईज बाय सयाजी (हॉटेल) व साई इन्फोटेक, अहिल्यानगर या दोन खासगी आस्थापना सहभागी होणार आहेत. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्याप सेवायोजन नोंदणी केली नसल्यास, त्यांनी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करावा. तसेच, उपक्रमाच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात.

उमेदवारांनी www.ncs.gov.in या राष्ट्रीय करिअर सेवा संकेतस्थळावरही नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी समन्वयक वसीमखान पठाण (मो. ९४०९५५५४६५) यांच्याशी संपर्क साधावा.

## गुलमोहर रोडवरून बुलेटची चोरी

नगर - बिल्डींगच्या पार्किंग मध्ये लावलेली बुलेट मोटारसायकल (क्र. एमएच १६ बी क्यु ६२०४) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवर असलेल्या अरिहंत बिल्डींग च्या पार्किंग मध्ये ६ फेब्रुवारी रोजी रात्री ७.३० ते ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान घडली.

याबाबत भास्कर बाबासाहेब भोसले (वय ५९, रा. काष्टी, ता.श्रीगोंदा) यांनी ९ फेब्रुवारी रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# विरोधी पक्षनेते पदासाठी बाळासाहेब बोराटेंच्या नावाची शिफारस

### शिवसेना गटनेते दत्ता कावरे यांनी दिले महापौर ज्योती गाडे यांना पत्र

नगर - महापालिकेत महापौर, उपमहापौर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आता पुढील निवडी होणार आहेत. याच अनुषंगाने शिवसेना शिंदे गटाचे गटनेते दत्तात्रय कावरे यांनी ९ फेब्रुवारी रोजी महापौर ज्योती गाडे यांना पत्र देत विरोधी पक्षनेतेपदी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांची निवड करावी, अशी मागणी केली आहे.

महापालिका निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाने जागा जिंकणाऱ्या पक्षातील नगरसेवकाची विरोधी पक्षनेता म्हणून निवड करता येते. ही निवड करण्याचा अधिकार महापौरांना असतो. महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) चे २७, भाजप २५ तर शिवसेना शिंदे गटाचे १० सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे महापालिकेत भाजप हा दुसऱ्या स्थानावर आहे. मात्र, भाजप हा सत्तेत सहभागी आहे. तर शिवसेना शिंदे गट विरोधात आहेत. त्यामुळे गटनेते कावरे यांनी विरोधी पक्षनेते पदासाठी बाळासाहेब बोराटेंच्या नावाची शिफारस केली आहे.


महापालिकेत विरोधी पक्षनेतेपदी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांची निवड करावी या मागणीचे पत्र महापौर ज्योती गाडे यांना देताना शिवसेना गटनेते दत्ता कावरे.

या संदर्भात शिवसेना सचिव संजय मोरे यांनी मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार महापालिकेत गटनेते पदी दत्ता कावरे व विरोधी पक्ष नेते पदी बाळासाहेब बोराटे यांची निवड करण्यात यावी असे पत्र शहर प्रमुख संभाजी कदम यांना दिले होते. त्यानुसार ही कार्यवाही केली असल्याचे सांगण्यात आले.

## शिवसेनेच्या शहरप्रमुखपदी संभाजी कदम यांची नियुक्ती

नगर - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने अहिल्यानगर शिवसेना शहरप्रमुखपदी संभाजी अशोकराव कदम यांची नियुक्ती जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी नियुक्तीचे पत्र दिले.



हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि आनंद दिघे यांची शिकवण यांचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल. तसेच शिवसेना पक्षवाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कारले खा निरोगी राहा...

शतकानुशतके भारतीय आहार आणि अन्न प्रणाली आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जात आहे. आधुनिक जीवनशैलीशी संबंधित अनेक गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी त्यांच्याकडे गुरुकिल्ली आहे. शतकानुशतके, भारतीय अन्न हे केवळ भूक भागवण्याचे साधन मानले जात नाही तर शरीर आणि मन संतुलित करण्याचा एक मार्ग मानले जात आहे. कारल्याची चव कडू असू शकते, परंतु ती आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. त्यात असलेले जैविकदृष्ट्या सक्रिय संयुगे, जीवनसत्त्वे आणि खनिजे अनेक गंभीर आजारांचा धोका कमी करण्यास मदत करतात. मधुमेह नियंत्रित करण्यासाठी कारल्याचे सेवन वर्षानुवर्षे केले जात आहे. त्याचे घटक, जसे की चॅरॅंटिन, व्हिसाइन आणि पॉलीपेप्टाइड-पी, शरीरात इन्सुलिनसारखे परिणाम दर्शवतात. अनेक अभ्यासातून असे आढळून आले आहे की कारल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होण्यास मदत होते आणि टाइप २ मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी ते उपयुक्त ठरू शकते. कारल्याचे नियमित सेवन केल्याने उपवास आणि जेवणानंतरची साखर नियंत्रित होण्यास मदत होते.

## पाककला

### मावा मिश्री लाडू

**साहित्य :** मावा १.५ कप (३०० ग्रॅम), पनीर (१५० ग्रॅम), खडीसाखर १५० ग्रॅम, वेलचीपूड, पिस्त्याचे तुकडे, १ चमचा

**कृती :** एका पॅनमध्ये मावा घाला आणि तो चांगला परतून घ्या. मावा हाताने थोडा मॅश करा आणि पॅनमध्ये ठेवा आणि गॅस मध्यम आचेवर ठेवा. मावा सतत ढवळत राहा आणि त्याचा रंग बदलेपर्यंत आणि तूप सुटेपर्यंत तळा. मावा तूप सुटेपर्यंत, त्यात किसलेले पनीर घाला आणि मिक्स करताना चांगले परतून घ्या. आता ते कोरडे होईपर्यंत परता, नंतर आच बंद करा आणि गरम पॅनमध्ये थोडे हलवा आणि एका भांड्यात काढा आणि थंड होऊ द्या. मावा पनीर थंड होईपर्यंत, १५० ग्रॅम खडीसाखर मिक्सरमध्ये फिरवून जरा बारीक करा. नंतर ते चाळणीतून गाळून घ्या, आता उरलेली खडबडीत पावडर पुन्हा बारीक करा आणि जाळून घ्या. सर्व साखरेची कॅंडी त्याच प्रकारे बारीक करा. मावा थंड झाल्यावर त्यात खडीसाखर मिसळा. अर्धा लहान चमचा वेलचीपूड घालून मिश्रण हाताने चांगले मिसळा. मिक्स केल्यानंतर थोडे हातात घ्या आणि लाडू बनवा. सर्व लाडू त्याच प्रकारे बनवा आणि पिस्त्याने सजवा.

## वास्तू

### दिशेसंबंधी ज्ञान

* नेहमी आपल्या घराच्या ईशान्य दिशेला दिवा किंवा मेणबत्ती लावा. जर तुमच्या समोरच्या दरवाजावर किंवा मुख्य दरवाजावर दिवे असतील तर ते बाहेरच्या दिशाने असतील याची खात्री करा.

* ताण आणि चिंतापासून दूर राहण्यासाठी, काम करताना किंवा अभ्यास करताना आपली दिशा उत्तर किंवा पूर्व ठेवा.

* आपल्या घराच्या ईशान्य कोपऱ्यात शौचालय किंवा पायऱ्या बांधू नका.

## सौंदर्य

काही हेअर सीरम केस सरळ करण्यास मदत करू शकतात, परंतु हे सर्व केसांच्या सीरमसाठी खरे नाही. हेअर सीरम केसांना गुळगुळीत आणि मऊ बनवते, ज्यामुळे ते सरळ दिसतात.

## सल्ला

नवीन कपडे घेतल्यानंतर हे फार म हत्त्वाचे आहेत की कधी ही आपण स्टोअर मधून कापडं घरी आणाल तर त्यांना आधी साबणाने धुवावे मगच वापरण्यात घ्यावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६

**दासनवमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, अनुराधा १०|५३, सूर्योदय ०६ वा. ४१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. प्रेमात स्थिती अनुकूल राहील. महत्त्वाच्या कामांमध्ये सावधगिरी बाळगा.

**वृषभ :** सर्व कामे योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी आज आपण नियोजन कराल. वाहने काळजीपूर्वक चालवा. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा.

**मिथुन :**महत्वाच्या एखाद्या सामुदायिक योजनेत इतर लोकांबरोबर आपले सहकार्य तुमची उत्तम राजकीय जाण दाखवेल. देवाण-घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा.

**कर्क :** स्थिती अनुकूल राहील. दिवस उत्तम राहील. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. नवीन करार होतील.

**सिंह :** इतर लोकांना तुमचे विचार पटतील. नोकरदारांनी कामात लक्ष द्यावे. अधिकारी आपणास सहकार्य करतील. आपल्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या :** मुलांवर खर्च होईल. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ :** अधिकाऱ्यांशी वाद-विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. विरोधक पराभूत होतील. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक.

**वृश्चिक :** आरोग्य उत्तम राहील. नवीन व्यावसायिक माहिती मिळेल. एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल.


**धनु :** कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. महत्वाच्या कार्यात यश मिळेल. आपल्या प्रकृतीची काळजी घ्या.

**मकर :** कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. आरोग्य उत्तम राहील. शत्रूंपासून सावध राहा. महत्वाच्या कामात सावधगिरी बाळगा.

**कुंभ :** अत्यंत व्यस्त राहाल. मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील.

**मीन :** अधिकार क्षेत्र वाढेल. शत्रूंना भीती वाटेल. आनंद वाढेल. आर्थिक स्थिती संमिश्र राहील.


## शब्दगंध क्र. ७३६४ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** २) येणे ६) फूल; पुष्प ७) परिश्रम; दगदग ८) नव्याने आलेला १०) अनेक कुटुंबे रहात असलेले मोठे घर ११) मीटिंग; बैठक १३) जंगल; रान; अरण्य; कांतार १५) स्वाद; गोडी; चव १७) खालचा भाग; बूड १८) वेगाने वाहणारी हवा; वारा २०) करंजी वगैरेत भरावयाचे मिश्रण; बाखर २१) पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील निर्वात पोकळी; अंतरिक्ष; ईथर

**उभे शब्द :-** १) दत्त संप्रदायातील एक विभूती - ++++++ सरस्वती २) तोंड; मुख; वदन ३) साह्य; सहकार्य ४) साहित्यातील नऊ प्रकारचे रस ५) नवऱ्याची दुसरी पत्नी ९) पगार १२) आपला देश १३) भोजनातील एक प्रमुख घटक १४) आकाश; गगन; अंबर १६) झाडाची पाने हलताना होणारा आवाज १८) पंख; दुसरा १९) पुत्राची किंवा कन्येची मुलगी

### शब्दगंध क्र. ७३६३ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : यशाची आस असली पाहिजे त्याच्याबद्दल विचार तर सर्वच करत असतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### संगणक नसता तर काय झाले असते?

आजचे युग हे विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगातील मानवाचा सर्वात जवळचा सोबती म्हणजे 'संगणक'. घर असो वा कार्यालय, शाळा असो वा अंतराळ केंद्र-प्रत्येक ठिकाणी संगणकाचा वावर आहे. पण कधी आपण विचार केला आहे का, की जर हा संगणक नसता तर आपले जीवन कसे असते? ही केवळ एक कल्पना असली, तरी ती आपल्याला संगणकाचे महत्त्व अधोरेखित करून देते. संगणक नसता तर आज जगाची प्रगती इतक्या वेगाने झाली नसती. आज आपल्याला हवी ती माहिती एका क्लिकवर मिळते. संगणक नसता तर माहिती शोधण्यासाठी आपल्याला तासनतास ग्रंथालयातील शेकडो पुस्तके चाळावी लागली असती. माहितीचा प्रसार होण्यासाठी महिने आणि वर्षे लागली असती, ज्यामुळे संपूर्ण जगाच्या प्रगतीचा वेग मंदावला असता.

आज आपण ई-मेल, सोशल मीडिया आणि व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून जगाच्या पाठीवर कुठेही असलेल्या व्यक्तीशी सेकंदात संवाद साधू शकतो. संगणक नसता तर आपण पुन्हा एकदा 'पत्रांच्या' युगात गेलो असतो. एखादा निरोप पोहोचण्यासाठी कित्येक दिवस वाट पाहावी लागली असती. रेल्वे, विमान किंवा बसचे आरक्षण करण्यासाठी आपल्याला आजही तासनतास लांब रांगांमध्ये उभे राहावे लागले असते. बँकिंग क्षेत्र तर संगणकाशिवाय अपंगच झाले असते. आज आपण 'डिजिटल पेमेंट' द्वारे सहज व्यवहार करतो. संगणक नसता तर बँकेतील सर्व नोंदी जाडजूड वह्यांमध्ये हाताने लिहाव्या लागल्या असत्या. हिशोबात चुका होण्याची शक्यता वाढली असती आणि साधे पैसे काढण्यासाठी सुद्धा दिवसभर बँकेत घालवावा लागला असता. कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या काळात जर संगणक नसता, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्था ठप्प झाली असती. ऑनलाईन शिक्षणामुळेच मुलांचे शैक्षणिक वर्ष वाचले. वैद्यकीय क्षेत्रातही एम.आर.आय, सीटी स्कॅन आणि अनेक जटिल शस्त्रक्रिया संगणकामुळेच शक्य आहेत. संगणक नसता तर अनेक असाध्य रोगांवर उपचार करणे कठीण झाले असते. दुसरीकडे, संगणक नसता तर मानवी नातेसंबंध अधिक दृढ असते. लोक एकमेकांच्या डोळ्यात बघून बोलले असते, मोबाईल किंवा लॅपटॉपमध्ये डोके खुपसून बसले नसते. डोळ्यांचे विकार, पाठदुखी आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या कमी असत्या. मुले मैदानावर खेळताना दिसली असती आणि माणसाचे जीवन अधिक नैसर्गिक असते. थोडक्यात सांगायचे तर, संगणक हा आधुनिक मानवाचा अविभाज्य भाग आहे. संगणक नसता तर आपले जग आजच्या तुलनेत किमान १०० वर्षे मागे असते. जगणे खूप कठीण आणि संथ झाले असते. जरी संगणकाचे काही तोटे असले, तरी त्याने दिलेल्या सुविधा अनमोल आहेत. संगणक हा एक उत्तम 'सेवक' आहे, पण त्याला 'मालक' बनू न देणे, हे आपल्या हातात आहे.

## गुरुवचन

मध्यप्रदेशातील एका घनदाट अरण्यात एका साधु महाराजांचा आश्रम होता साधुजींसह त्यांचे दहा बारा परमशिष्य तिथं रहात असत. महाराजांचा नावलौकिक व अनुभूती यामुळे तिथं भक्तांची नियमित वर्दळ असे, उत्सवाला तर जत्रा फुलायची. परिणामी आश्रमाची आर्थिक स्थिती उत्तम होती. चंदन हा महाराजांचा आवडता शिष्य.

एक दिवस चंदन अगदी आनंदात साधुजींच्या चरणाजवळ बसला व म्हणाला, महाराज गावावरून निरोप आलाय की बहिणीला एक चांगलं स्थळ आलय व पुढील महिन्यात लग्नाची तारीख निघालीय. मला आठ दहा दिवस सुट्टी हवीय आणि आपणही लग्नाला उपस्थित रहावं असं आम्हाला वाटतं, आणि आपल्या सहकार्याशिवाय हा सोहळा पूर्ण होणं केवळ अशक्य !

महाराज आनंदी होऊन आशीर्वाद देत म्हणाले चंदन बाळ तू या मठाचा एक विश्वासू सेवक आहेस त्यामुळे तुला हवी तेवढी रजा घे, सोबत आणखी दोन सेवक तुझ्या मदती साठी ने, हो.... आणि जाण्यापूर्वी मला भेटून जा कारण भक्तांची सतत रीघ असल्यामुळे मी एवढ्या दूर येऊ शकत नाही मात्र तुझ्या बहिणीसाठी आशीर्वाद मात्र नक्की देईन.

चंदनचा आनंद गगनी न मावणारा होता. आपली निष्ठा व भक्ती फळा आली, आता मी माझ्या बहिणीला मोठ्या थाटामाटात निरोप देईन. चंदन आता बहिणीच्या लग्नाची स्वप्न पाहू लागला. त्याला गावी जायचे वेध लागले आपल्या गुरूंकडून भरघोस मदत मिळेल या आशेवर चंदन दिवस काढत होता. अखेर लग्नाच्या १५ दिवस अगोदर चंदन दोन सहकारी सेवकांसह गावी जाण्यास निघाला. साधुजींच्या कक्षात निरोप घेण्यासाठी गेला. गुरुंनी जेमतेम तिघांच्या गाडी भाड्यापूरते पैसे व एका गाठोड्यात पाच किलो उत्तम दर्जाचे डाळींब दिले व आशीर्वाद देत म्हणाले हे तुझ्या बहिणीसाठी भेट.... ! चिंता करू नको. सर्व छान होईल. आज पर्यंत तुझ्या गावात कुणाचच लग्न इतक्या दिमाखात नसेल झालं असं थाटात व धूमधडाक्यात बहिणीचं लग्न कर. गुरूकृपेचं गाठोडं सोबत आहेच.

चंदन काहीही न बोलता गुरूचरणाला स्पर्श करून थेट रेल्वे स्टेशनकडे निघाला. आता चंदनजवळ कधीतरी भक्तगणांकडून बक्षीस म्हणून मिळालेल्या पैशातून जमवलेली दहाबारा हजार रक्कम होती. गुरूजी मोठी मदत करतील ही अपेक्षा फोल ठरली होती. डोक्यात विचारांचं थैमान सुरू झालं, आईवडीलांना काय उत्तर देऊ? बहिणीला कसं तोंड दाखवू? प्रचंड घालमेल......

कितीही आध्यात्मिक वृत्ती असली तरी ती पैशात रूपांतरीत होणार नाही आणि कितीही आशीर्वाद असले तरी पत्रावळीवर वाढायला जेवणच लागणार... पैशांच्या विवंचनेत असलेल्या चंदनने दिड दिवसाच्या प्रवासाअंती राजस्थान गाठलं राहून राहून त्या निरूपयोगी डाळींबाच्या ओझ्याची चीड येत होती, पुढचा प्रवास अर्धा टांग्याचा व अर्धा पायी होता त्यामुळं एकदा मनात विचार आला हे ओझं इथच द्यावं फेकून. परंतू सहकारी सेवक काय म्हणतील या भीतीने ते तसच घरी नेणं क्रमप्राप्त होतं.

(क्रमशः)



## जीवन का अमृत (भाग १)

अपने व्यापार को पूरी तरह भूल जाएँ, यह मानकर कि आपने इसे किसी और अधिक शक्तिशाली और योग्य शक्ति को सौंप दिया है। तब आप तनाव मुक्त हों जाएँ, पूर्णतया तनाव मुक्त। और तब आपके पास जो भी समय हो, उसे बिना किसी रुकावट के, पूरी श्रद्धा और प्रेम के साथ, आध्यात्मिक अभ्यासों में लगाएँ, उतनी ही गम्भीरता और सही ढंग से, जितनी आप अपने व्यापार में लगाते हैं। मन में इस या उस अनुभव को पाने की चाहत न रखो। अपने सिर पर कार्यरत, हमेशा आपके साथ रहने वाली गुरु-शक्ति पर छोड़ दो कि जो भी वह ठीक समझे, दे दे। आप अपनी ओर से भजन अभ्यास का आनंद उठाओ और इसका नतीजा सतगुरु पर छोड़ दो।

### ज्योती और आवाज

ज्योति और आवाज के एक साथ आने में कोई गलत बात नहीं है । पर ध्यान-अभ्यास के समय, अगर आप देखने के अभ्यास में लगे हैं, तो आवाज की ओर कोई ध्यान न दें और अगर आप आवाज़ को सुन रहे हैं तो पूर्णतया आवाज़ की ओर ही ध्यान दें। अगर आप दोनों ओर ध्यान लगाओगे, तो ध्यान बँट जाएगा। गुरु-शक्ति लगातार आपके सिर पर काम कर रही है, आपको देखती हुई और आपकी हर प्रकार से रक्षा करती हुई । यह सब हज़ूर बाबा सावन सिंह जी की दया है, जो काम कर रही है। कोई आश्चर्य नहीं कि आप लगातार महसूस करते हैं कि उनकी प्यारी और सतर्क आँखें आपकी रक्षा कर रहीं हैं। आपको सिर्फ ग्रहणशील बनना है, ताकि आप सतगुरु के प्रेम और दया को अधिक से अधिक पा सकें। कई जिज्ञासु कुछ उच्च आत्माओं के संरक्षण में होते हैं, जो हमेशा उनका मार्गदर्शन करती हैं और अंत में उन्हें किसी जिंदा सतगुरु के चरणों में ले जाती हैं, ताकि इस रास्ते पर उनकी तरक्की हो सके। पुराने महापुरुषों का

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

आज्ञा चक्र को जागृत करने के लिए ब्रह्मा कुमारीज द्वारा सिखाया जा रहा राजयोग सब से उत्तम और सहज है। इस का कोई भी किसी भी धर्म का व्यक्ति अभ्यास कर सकता है। किसी भी आरामदायक स्थिति में बैठ कर अभ्यास कर सकता है। बीमार व्यक्ति भी अभ्यास कर सकता है। इस का कोई साइड इफेक्ट नहीं है। इस राजयोग में भगवान को बिंदू माना गया है। भगवान को परमधाम निवासी माना गया है। कल्पना में भगवान को परमधाम में देखते हैं और भगवान के गुणों का सिमरण करते हैं। थोडा सा अभ्यास करने से ही बहुत अच्छी अनुभूति होने लगती है। राजयोग की विधि सीख कर आप चलते फिरते और काम करते हुए योग का अभ्यास कर सकते हैं और साधना का सुख महसूस कर सकते हैं। ऐसा अभ्यास करने से आज्ञा चक्र सदा संतुलन में रहेगा।

### चक्र संतुलन

अगर थोड़ा सा भी नकारात्मक संकल्प चलता है समझो आज्ञा चक्र असंतुलित है। अगर हमारे सकारात्मक संकल्प चलते हैं तो समझो आज्ञा चक्र सन्तुलन में है। अगर आप ब्रह्मा कुमार या कुमारी हैं तो २० पेज अव्यक्त मुरली के हर रोज पढ़ते रहें जब तक आप जीवित हैं। अगर आप नास्तिक हैं तो २० पेज किसी भी बुक जो सकारात्मक चिन्तन पर है डेली पढ़ते रहें। आप का आज्ञा चक्र सदा जागृत रहेगा।

आज्ञा चक्र - ९४- घोड़ो की टाप

भागते हुए घोड़ो के पैरों की आवाज टप टप का आज्ञा चक्र पर असर होता है। मन में भागते हुए घोड़े देखें और उन की टप टप की आवाज सुनते रहें और सिमरण करते रहने से आज्ञा चक्र संतुलित रहता है।

आज्ञा चक्र -९५- संगीत

जरा भी मन में परेशानी है तो अच्छे मन भावन गाने और भजन सुनने से आज्ञा चक्र संतुलित हो जाता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक बरं आहे की सर्व देव भारतातच होऊन गेले...नाहीतर तर... घरातल्या बायकांनी हट्ट धरला असता... 'लंडनच्या भैरोबाचा नवस आहे, फेडायला जायचंय... जपानच्या देवीला बोलले होते एकदा दर्शनाला येते... ऑस्ट्रेलियात वारीला पटकन जाऊन येते... नवरा आयुष्यभर उधारीत, आणि बायको वारीत

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात पहिली रेल सेवा कोठे सुरू झाली?

– इंग्लंड १८८५

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

त्यांचा खाऊन उरलेला मध हा आपल्याला मिळतो. भारतात काश्मीर, गुजरात, म्हैसूर, हिमालय, महाराष्ट्र या भागात मध जास्त प्रमाणात मिळतो.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : मध हा बुद्धी व स्मृती वाढविणारा आहे.

मधु शीतं लघु स्वादु रूक्षं स्वर्यं च ग्राहकम् । चक्षुष्य लेखनं चाग्निदीपकं व्रणशोधकम् ।। नाडीशुद्धिकरं सूक्ष्मं रोपणं मृदू वर्णकृत् । मेधाकरं च विशदं वृष्यं रुचिकरं मतम् ।।

निघंटु रत्नाकर

मध हा चवीला गोड, शीत वीर्याचा लघु व रूक्ष असून, लेखनकार्य करणारा आहे. शरीरावर झालेल्या जखमेची स्वच्छता करून नाडीव्रणाची शुद्धी करणारा आहे. तसेच डोळ्यांना हितकारक, जखमा भरून काढणारा, त्याच्या सूक्ष्म गुणाने शरीरातील सर्व स्रोतसांमध्ये प्रवेश करणारा, अग्नी प्रदीप्त करून भूक वाढविणारा, बुद्धी व स्मृतिवर्धक व रुचकर आहे.

### मध

याचे आठ प्रकार सांगितलेले आहेत - १) माक्षिक, २) भ्रामर, ३) क्षौद्र, ४) पौतिक, ५) छात्र, ६) आर्ध्य, ७) औद्दालक, ८) दाल हे आठ प्रकार होत. हे सर्व प्रकार मध गोळा करण्याच्या मधमाश्यांच्या नावावरून दिलेले आहेत.

आधुनिक शास्त्रानुसार : मधामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'क' जीवनसत्त्व, थोड्या प्रमाणात 'ब' जीवनसत्त्व, आर्द्रता, प्रथिने, खनिजे, पिष्टमय पदार्थ असे अनेक औषधी घटक आहेत. तसेच संशोधनामध्ये असे सिद्ध झाले आहे, की मधातील परागांमुळे त्यात सर्वच्या सर्व ॲमिनो ॲसिड्स, खनिजे, एन्झाईम्स, मेदाम्ले व पिष्टमय पदार्थ असतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# व्यक्ती आणि समाजातील 'अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी' विवेकी आचार हाच खात्रीशीर उपाय : डॉ.ठकसेन गोराणे

नगर – वैज्ञानिक दृष्टिकोनाला जीवनाच्या मूल्याशयांची जोड दिली की विवेक निर्माण होतो आणि हाच विवेकाचा विचार जर व्यक्ती व समाजाच्या आचारात आला तर व्यक्तीच्या आणि एकूणच समाजाच्या जीवनातील अंधश्रद्धांचे निर्मूलन करणे सोपे होते. म्हणून विवेकशील वर्तन हाच अंधश्रद्धा निर्मूलनाचा मुख्य उपाय आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे यांनी केले.


अहिल्यानगर येथे झालेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा बैठकित मार्गदर्शन करताना राज्य प्रधान सचिव डॉ.ठकसेन गोराणे. समवेत कॉ.बाबा आरगडे, बाबासाहेब बुधवंत, विष्णू गायकवाड आदी.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अहिल्यानगर जिल्हा शाखेची जिल्हा बैठक राज्य सल्लागार कॉ. बाबा आरगडे यांच्या अध्यक्षतेखाली शार्दुल नर्सरी येथे झाली. त्यावेळी डॉ. गोराणे बोलत होते. महाराष्ट्र अंनिसचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बाबासाहेब बुधवंत, कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, शहर कार्याध्यक्ष भारतभूषण भागवत, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा, बी.के. चव्हाण, दिपक शिरसाठ, छाया बंगाळ, प्रा. किसन माने, प्रमोद भारूळे, बबनराव धावणे आदी विचारमंचावर उपस्थित होते.

डॉ.गोराणे पुढे म्हणाले की, व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणे अपेक्षित होते. पण तसे पुरेसा प्रमाणात झाले नाही. त्यामुळे आज समाजात अंधश्रद्धा वाढताना दिसतात. यासाठी तरुण–तरुणी आणि विशेषतः महिलांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याला स्वतःहून जोडून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

अंनिसचे जिल्हाअध्यक्ष बाबासाहेब बुधवंत म्हणाले की, अलीकडच्या काळात भोंदूगिरीचे स्वरूप बदलले आहे. भोंदूना कायद्याचा धाक वाटलाच पाहिजे. चाप बसला पाहिजे.त्यासाठी कार्यकर्त्यांनी जागरूक राहून, भोंदूगिरीबाबत पोलिसांना वेळोवेळी माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

कॉ.बाबा आरगडे यांनी समाज सुधारकांनी केलेल्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याचे उदाहरणे देत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

बैठकीच्या प्रारंभी चळवळीचे गीत होऊन, सर्वांचे स्वागत व परिचय झाला. त्यानंतर तालुका निहाय अहवाल वाचन झाले. कर्जत तालुका अहवाल वाचन हरिश्चंद्र काळे, पाथर्डी तालुका अहवाल मल्हारराव खेडकर, शेवगाव तालुका अहवाल चिमाजी धनवडे, कोपरगाव तालुका अहवाल दिपक शिरसाठ, नेवासा तालुका व भेंडा शाखा अहवाल आप्पासाहेब वाबळे, पारनेर तालुका व कान्हूरपठार शाखा अहवाल कैलास लोंढे, अहिल्यानगर शहर शाखा अहवालाचे भारतभूषण भागवत यांनी वाचन केले.

जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचा वार्षिक आढावा मांडला.

पुढील आठवडा भरात प्रत्येक शाखेमध्ये नवीन सभासद नोंदणीसाठी अभियान राबवणे, त्यानंतर जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये प्रत्येक शाखेची शाखा कार्यकारिणीची निवड करणे, प्रत्येक शाखेत राष्ट्रीय विज्ञान दिन नाविन्यपूर्ण उपक्रम, कार्यक्रम घेऊन साजरा होईल, याचे नियोजन करण्याचे ठरले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक जूनच्या पहिल्या आठवड्यात अहिल्यानगर जिल्ह्यात होणार आहे. त्याबाबतचे नियोजन आत्तापासूनच करण्याचा निर्णय झाला. यावेळी बिपिन गायकवाड यांना पुरस्कार मिळाल्याने विशेष सन्मान करण्यात आला. तसेच सौंदाळे गावाने जात सोडली ग्रामपंचायतने या ऐतिहासिक घेतलेल्या निर्णयाचे स्वागत सौंदाळे गावात जाऊन करण्याचे ठरले.

याशिवाय अंनिसचे कायदे विषयक सल्लागार ॲड. अभय राजे यांनी निसर्गरम्य परिसरातील हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

या जिल्हा बैठकीसाठी चिमाजी धनवडे, कैलास लोंढे, शब्बीरभाई पठाण, बाळू भैलमे, हरिश्चंद्र काळे, मेघा झावरे, मल्हारी खेडकर, अमोल भांडेकर, आशाताई चव्हाण, बिपीन गायकवाड, खिवराज दुर्गिंग, आप्पासाहेब वाबळे, कॉ.भारत आरगडे, वसंत जगधने, प्रमोद लांडे, संदीप शिंदे, रामनाथ भुजाडे, भाऊसाहेब एडके, पुष्पा आरगडे, रेणूका चौधरी, अनिता सापा, संकेत शिंदे, प्रतिक ठोकळ आदी ९ शाखांचे कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विनायक ताकपेरे, ललीत भारूळे, भावना भारूळे यांनी विशेष प्रयत्न केले.

विनायक सापा यांनी प्रास्ताविक केले. बाळासाहेब बुधवंत यांनी आभार मानले. हम होंगे कामयाब या गीताने बैठकीचा समारोप झाला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अष्टमहासिद्धी : सहज भजन

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

संत, अवलिया, सिद्ध आणि साधू अशा महात्म्यांच्या विविध अवस्था आहेत. दिव्यत्वाची शक्ती घेऊन वावरणारे अवलिया किंवा सिद्धपुरुष लोककल्याणासाठी जेव्हा सिद्धीचा उपयोग करतात तेव्हा तेही साधुत्वाच्या पातळीवर जाऊन बसतात. संत मात्र सिद्धीला कधीच महत्त्व देत नाहीत. सिद्धीला ओलांडून ते पलीकडे गेलेले असतात. सिद्धी हे त्यांचे ध्येय नाही, सिद्धीप्राप्तीने लोककल्याण हे देखील प्रयोजन नाही. शुद्ध भक्तिने मानवातील दिव्यत्वाला उभे करणे आणि संस्कार्यातून मानवता जागविणे हे संतांचे कार्य. संतांच्या लेखी भक्तिच्या वाटेवरील सिद्धी हा मोठा अडसर आहे. भागवतात नाथमहाराज सांगतात,

भक्ती माझे करिता भजन ।
अवश्य सिद्धी उपजती जाण ।
त्या त्यागावी विघ्न म्हणोनी ।।

भक्तांनी माझे भजन केले की हटकून सिद्धी तेथे येतात आणि भजनातही विघ्न आणतात. सिद्धीच्याही पलीकडे गेला आहे तो संत. भागवतात भगवंताने म्हटले आहे की मनाने, वाणीने किंवा कर्माने जो देहाचे देहपण ठेवतो की त्यात विसरतो आणि माझ्या स्वरूपाने युक्त होऊ लागतो. त्याच्यापाशी सिद्धी हात जोडून उभ्या असतात. सिद्धींची आठ लक्षणे अष्टमहासिद्धीतून व्यक्त होतात. या अष्टमहासिद्धी कोणत्या? अणिमा, महिमा, लघिमा, प्राप्ती, प्रकाश, ईशिता, वशिता, यत्काम या त्या आठ सिद्धी होत. अणिमा, महिमा आणि लघिमा या तिन्ही देहसिद्धीच्या योगाने प्राप्त होतात. विषयांची प्राप्ती ही चौथी सिद्धी. परलोकानी अदृश्य लोकांचे ज्ञान ही प्रकाश सिद्धी आणि त्या शक्तिंची प्रेरणा करणारी असंग ईशिता ही सहावी. सुखाला आणि देवाला वश करणारी वशिता ही सातवी तर इच्छिलेल्या सुखाची प्राप्ती ही यत्काम आठवी सिद्धी होय. सिद्धी या सकामतेचे दर्शन आहे. सिद्धी या लौकिक सुखोपभोगासाठी आहेत. त्यामुळे सिद्धी प्राप्त झालेला सिद्धपुरुष अहंकाराचा खूप जवळचा मित्र बनतो. त्या अहंकाराला तो जगाकडे एक भेदबुद्धिने पाहतो. नाथमहाराज तर स्पष्टपणे सांगतात,

अहेतुक करिता माझे भजन
तेथे शीघ्र माझी प्राप्ती जाण
तेथे सिद्धींवरी घालिता मन
आली नागवण मत्प्राप्तीसी ।

सिद्धीच्या मागे लागला तर माझ्या प्राप्तीला अडसर आला म्हणून समज पण निष्काम भजनात मात्र मी तुझ्या समोरच उभा असतो. अष्टमहासिद्धीचा आनंद एकट्या भजनात मिळतो.

– किशोर गांधी


'सनफार्मा'कडून निंबळक विद्यालयास ११० बाकांची मदत देण्यात आली.

# 'सनफार्मा'कडून निंबळक विद्यालयास ११० बाकांची मदत

निंबळक – सन फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज कंपनी एम.आय.डी.सी. अहिल्यानगर यांच्या वतीने ७ फेब्रुवारी रोजी विद्यालयाला ११० बेंचेस दिले. त्या बेंचचा शाळार्पण सोहळा पार पडला. या बेंचेस मुळे विद्यालयातील सर्व विद्यार्थी आता बेंचेस वर बसणार आहेत. त्याचप्रमाणे कंपनी च्या योगदानातून विद्यालयाला क्रीडा साहित्य व डिजिटल रूम मिळाली. क्रीडा साहित्याचा वापर करून विद्यार्थी विविध खेळांमध्ये नैपुन्य संपादन करत आहेत. त्याचप्रमाणे डिजिटल रूमच्या माध्यमातून विद्यार्थी स्पर्धेच्या युगाला सामोरे जाण्यासाठी तयार होत आहेत. या कर्यक्रमासाठी कंपनीचे सोमनाथ दडस, संस्थेचे अध्यक्ष नितीन कोतकर, प्रशांत कोतकर, पालक माधव रेपाळे, रामा माने, आदिनाथ गोडसे, सर्व सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोमनाथ दडस होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना वेळेचे महत्व व अभ्यासाचे महत्त्व सांगून एस.एस. सी बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष नितीन कोतकर यांनी विद्यार्थ्यांना एस. एस. सी. बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कोतकर व्ही.एम. यांनी आभार प्रदर्शन केले.

# सातवीपर्यंत थांबलेले शिक्षण ते बी.ए., एम. ए. इतिहासात प्रथम श्रेणीत यश

## उषा शिंदे-जगधने यांची प्रेरणादायी वाटचाल; न्यू आर्टस् कॉलेज शेवगाव येथे सन्मान

नगर – शिक्षणासाठी निर्माण झालेल्या अनेक अडचणी, सामाजिक बंधने आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा सामना करत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उषा अशोक शिंदे–जगधने यांनी बी.ए., एम.ए. (इतिहास विभाग) मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला आहे. त्यांच्या या यशाबद्दल न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, शेवगाव येथे विशेष सन्मान करण्यात आला.


उषा अशोक शिंदे–जगधने यांनी बी.ए., एम.ए. (इतिहास विभाग) मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला आहे. त्यांच्या या यशाबद्दल न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, शेवगाव येथे विशेष सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यास आबासाहेब काकडे विद्यालयातील अशोक तनमर, गायकवाड सर, पुजारी मॅडम, तसेच न्यू आर्टस् कॉलेज शेवगावचे प्रा. डॉ. मिरे, प्रा. नवथर सर, प्रा. डॉ. शेळके सर, प्रा. वैद्य सर, प्रा. शेंडगे, प्रा. कसबे आदी प्राध्यापक उपस्थित होते. उपस्थितांनी उषा शिंदे यांच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक करत त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

उषा अशोक शिंदे (जगधने) यांचे शिक्षण लग्नाच्या वेळी केवळ सातवीपर्यंत झाले होते. परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेणे शक्य झाले नाही. मात्र लग्नानंतर त्यांचे पती अशोक शिंदे, जे सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत, त्यांनी महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन पत्नीला शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. या प्रेरणेला सकारात्मक प्रतिसाद देत उषा शिंदे यांनी २०१८ पासून पुन्हा शिक्षणाची सुरुवात केली.

त्यांनी आबासाहेब काकडे विद्यालयातून १७ नंबरचा फॉर्म भरून दहावीत प्रवेश घेतला. त्यानंतर कोणतीही अडचण शिक्षणाच्या आड येऊ न देता त्यांनी सातत्य, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर दहावी, बारावी आणि पुढे बी.ए., एम. ए. (इतिहास) हा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. विशेष म्हणजे बी.ए. परीक्षेत त्यांनी प्रथम श्रेणी मिळवून यशाची मोहोर उमटवली.

या यशामुळे उषा शिंदे यांनी केवळ स्वतःचे स्वप्न पूर्ण केले नाही, तर इतर महिलांसाठी शिक्षणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा पुढील काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक विचारांवर संशोधन करण्याचा तसेच कायद्याचे (लॉ) शिक्षण घेण्याचा मानस आहे. यासोबतच त्यांनी बालविवाह प्रतिबंधासाठी समाजजागृतीचे कार्य देखील सुरू केले आहे. या संपूर्ण शैक्षणिक व सामाजिक प्रवासात त्यांना त्यांचे पती अशोक शिंदे यांचे मार्गदर्शन आणि पाठबळ लाभत आहे.

# शारीरिक आणि मानसिक सदृढतेसाठी मैदानी खेळात सहभाग आवश्यक

## संतोष वाबळे यांचे प्रतिपादन, 'एसा स्पोर्टस् विक २०२६' चे पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने उद्‌घाटन

नगर – खेळ ही केवळ शारीरिक तंदुरुस्तीची नव्हे, तर मानसिक सबलीकरणाचीही गुरुकिल्ली आहे. खेळामुळे संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन राज्य क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे यांनी केले.


एसा (आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर) आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसा स्पोर्टस् विक २०२६' च्या उद्‌घाटनप्रसंगी संतोष वाबळे. (छाया – लहू दळवी)

एसा (आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर) आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसा स्पोर्टस् विक २०२६' च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या वर्षीच्या क्रीडा आठवड्याची सुरुवात मिनी मॅरेथॉन स्पर्धेने झाली. उत्साहवर्धक वातावरणात झालेल्या या स्पर्धेला सभासद आणि कुटुंबीयांनी प्रतिसाद दिला. अमोल येनगंदुल आणि गौरव मांडगे यांनी समन्वयक म्हणून उत्कृष्ट नियोजन केले.

मॅरेथॉन स्पर्धेत उदित हिरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, वैभव निमसे द्वितीय ठरले, तर अमोल येनगंदुल आणि सुनिल औटी यांनी संयुक्तरीत्या तृतीय स्थान मिळवले. त्यानंतर झालेल्या चेस (बुद्धिबळ) स्पर्धेत रोशन गुगळे विजेते, तर नूतन सभासद शुभम आगरकर उपविजेते ठरले.

स्पोर्टस् विक दरम्यान विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. स्पोर्टस् कमिटी हेड जितेश सचदेव यांनी सांगितले की, या वर्षी मिनी मॅरेथॉन, बॅडमिंटन, चेस, फुटबॉल, कॅरम, टेबल टेनिस, पिकल बॉल आणि क्रिकेट अशा आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमाला नवी ऊर्जा देतो, असे ते म्हणाले.

उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी संतोष वाबळे म्हणाले, खेळ हे केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आरोग्यासाठीही आवश्यक आहेत. क्रीडा संस्कृतीमुळे यश–अपयश पचविण्याची ताकद निर्माण होते, संघभावना जोपासली जाते आणि नाती दृढ होतात. दिवसाची सुरुवात खेळाने केली, तर ऊर्जा आणि सकारात्मकता वाढते, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी एसा असोसिएशनच्या क्रीडा उपक्रमाचे कौतुक करत सर्व सभासदांना खेळात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या यशात पोलाद स्टील कंपनीचे असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट आशिष भाबडा आणि मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह सुशांत गव्हाणे यांचे सहकार्य लाभले.

कंपनीचे आदेश गुंगे यांनी सांगितले की, क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातून सभासदांना मैदानी खेळाचे महत्त्व पटवून देण्याची संधी मिळते. हे आरोग्यदायी समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

स्पोर्टस् कमिटी सदस्य आकिब काझी, अविनाश देवी, ओमकार म्हसे, झोहेब खान, अमेय कुलकर्णी, सागर ढगे, संकेत पादिर आणि गौरव मांडगे यांनी आयोजनात परिश्रम घेतले.

संस्थेचे अध्यक्ष अभिजीत देवी यांनी सांगितले की, गेल्या पाच वर्षांपासून एसा स्पोर्टस् विकमध्ये सहा–सात क्रीडा प्रकारांचा समावेश केला जातो. सभासदांचा सहभाग आणि उत्साहच या उपक्रमाचे यश आहे, असे त्यांनी सांगितले.

या वेळी सचिव भूषण पांडव, संतोष खांडेकर, आदिनाथ दहिफळे, सचिन डागा, सुनिल जाधव, प्रथमेश सोनावणे, विकार काझी, किरण टकले, अभिजित शिंदे, रवी माने, अजिंक्य बालटे, मधुकर बालटे, सुशील मुथा आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उपाध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी केले. सचिव भूषण पांडव यांनी आभार मानले.


एन.एम.फाऊंडेशनचे जाहीद सय्यद यांनी दरगाह दायरा येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी मुख्याध्यापक फैय्याज शेख यांनी त्यांचे स्वागत केले.

# शिक्षकांच्या मेहनतीने उर्दू शाळांचा शैक्षणिक स्तर उंचावले : जाहीद सय्यद

नगर – उर्दू भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपली समृद्ध संस्कृती इतिहास आणि साहित्य जपणारी अमूल्य देणगी आहे. उर्दू शाळांमधील शिक्षक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करत आहेत. त्यांच्या या मेहनतीमुळेच आज उर्दू शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावत आहे.नव्या पिढीनेही उर्दू भाषा आत्मसात करून ज्ञान संस्कार आणि समाजसेवेची वाट निवडावी. उर्दू शाळांचा विकास म्हणजे समाजाचा विकास आहे, आणि या कार्यात आपण सर्वांनी एकत्र येऊन योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन एन.एम.फाऊंडेशनचे जाहीद सय्यद यांनी केले.

जाहीद सय्यद यांनी १८८८ साली स्थापन झालेल्या दरगाह दायरा येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट दिली.

यावेळी मुख्याध्यापक फैय्याज शेख यांनी त्यांचे स्वागत करून शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी शेख ताहेरा शिरीन मोहम्मद हुसेन, शेख नसीम मोहम्मद इब्राहिम, शेख शाकेरा अजीज, शिरीन खान आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. भेटीदरम्यान जाहीद सय्यद यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, तसेच शिक्षकांच्या मेहनतीचे कौतुक केले. शिक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे उर्दू शाळांचा शैक्षणिक स्तर उंचावत असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १३ फेब्रवारी रोजी अस्थिरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे १३ फेब्रवारी रोजी अस्थिरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते २ यावेळेत हे शिबीर होईल. यात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ.रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ.अमित सुराणा, डॉ. अक्षय गादिया रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. हॉस्पिटलमध्ये लवकरच अत्याधुनिक रोबोटिक सर्जरी सुविधाही उपलब्ध होणार आहे.



या शिबिरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजारांहून पुढील किंमतीत करण्यात येईल. यात गुणवत्तापूर्ण इम्प्लांटचा समावेश असून औषध खर्च वेगळा असेल. रूग्णांवरील प्रभावी उपचारांसाठी हॉस्पिटलमध्ये परिपूर्ण व सुसज्ज फिजिओथेरपी विभाग आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलने सातत्याने अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याअंतर्गत आता जागतिक दर्जाची रोबोटिक सर्जरी सुविधाही उपलब्ध होणार आहे.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक मशीनव्दारे डायलेसिस सेवाही उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, एमआरआय २५०० रुपयांत उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. या शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

नगर – महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच विविध गुणांना वाव देण्यासाठी साडी डे, ट्रॅडिशनल डे, बॉलीवुड डे, या दिवसांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबरव्यवहार व व्यवसाय प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळवण्यासाठी ट्रेड फेअरचे आयोजन निश्चितच मार्गदर्शन ठरेल, असे प्रतिपादन ट्रेड फेअरच्या उद्‌घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांनी केले.



विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच विविध गुणांना वाव देण्यासाठी राधाबाई काळे महिला महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य प्रो. डॉ. भूपेंद्र निकाळजे, प्रो. डॉ. बाळासाहेब मुंडे, डॉ. सतीश सायकर, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. गणेश विधाते, डॉ. विष्णू आडसरे, डॉ. सचिन कोतकरउपस्थित होते. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व वाणिज्य विभागाच्या वतीने या विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेल्या अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करून विरंगुळा व त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा, या उद्देशाने असे मेळावे उपयुक्त ठरतात. विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने चविष्ट व चटकदार खाद्य पदार्थ बनवले होते. विविध खेळ, कलाकुसरीच्या वस्तू स्टॉलची मांडणी अतिशय आकर्षक केली होती. विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद विद्यार्थीनी, पालक व शिक्षकांनी लुटला. सुमारे ४० स्टॉल लावण्यात आले होते. त्यातून लाखोंची विक्री झाली आहे. अशी माहिती सांस्कृतिक विभाग प्रमुख व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. शुभांगी ठुबे यांनी दिली.

यावेळी महाविद्यालयाचे ज्युनिअर विभाग प्रमुख प्रा. अनिल जाधव, अर्जुन जायभाये, डॉ. फातेमा अंबेकर, प्रा. अश्विनी कराळे तसेच वाणिज्य विभागातील प्रा. महेश जाधव,प्रा. शुभम पाठक, प्रा. क्रांती बारस्कर, प्रा. स्नेहा पाटील, प्रा. आयेशा शेख व शिक्षकेतर सेवक यांचे सहकार्य लाभले.



पियुषा शैलेश पानमळकर हिने कुरुक्षेत्र हरियाणा येथे सुरू असलेल्या ३५ वी किशोर किशोरी सब ज्युनिअर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र मुली संघामध्ये उत्तम खेळ खेळून अंतिम फेरीमध्ये राजस्थान संघाचा एक पाळी दहा गुणांनी पराभव करून विजय प्राप्त केला. त्याबद्दल तिला सुवर्णपदक देण्यात आले.

# राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत पियुषा पानमळकरचे यश

नगर – येथील पियुषा शैलेश पानमळकर हिने कुरुक्षेत्र हरियाणा येथे सुरू असलेल्या ३५ वी किशोर किशोरी सब ज्युनिअर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र मुली संघामध्ये उत्तम खेळ खेळून अंतिम फेरीमध्ये राजस्थान संघाचा एक पाळी दहा गुणांनी पराभव करून विजय प्राप्त केला. त्याबद्दल तिला सुवर्णपदक देण्यात आले.

भिंगार को-ऑप. बँकेतील कर्मचारी शैलेश पानमळकर यांची ती कन्या असून ती सध्या धाराशिव येथे शालेय शिक्षणाबरोबर क्रीडा शिक्षण घेत आहे. तिने खो खो खेळा उत्तम कामगिरी करून सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल, भिंगार बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन तसेच सर्व संचालक मंडळाने अभिनंदन करून तिच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. माळीवाडा येथील भिंगार बँकेच्या शाखेमध्ये तिचा नुकताच सत्कार करण्यात आला.

यावेळी बँकेचे शाखाधिकारी राहुल जाधव, ऑफिसर निलेश राऊत, तसेच वंदना खेडकर, आदिनाथ बोडखे, शैलेश पानमळकर, अजय डहाळे, अतुल साठे, अरुण झोडगे, सुमित कावळे, शर्मा इत्यादी उपस्थित होते.

# वकिली व्यवसायात कायद्याचे सखोल ज्ञान आवश्यक

### न्या. संजय ए. देशमुख यांचे प्रतिपादन



न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर आयोजित कै. एस. बी. म्हसे पा. आठव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संजय ए. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. (छाया – समीर मन्यार)

नगर – वकिली व्यवसायात कायद्याचे मूलभूत ज्ञान आणि त्यामागील उद्देश यांची सखोल समज असणे अत्यावश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या तसेच नव्याने लागू होणाऱ्या सर्व कायद्यांचा अभ्यास करून समाजहितासाठी त्यांचा योग्य वापर करणे ही वकिलांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संजय ए. देशमुख यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर आयोजित कै. एस. बी. म्हसे पा. आठव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पा. होत्या.

यावेळी व्यासपीठावर सौ. देशमुख, विश्वस्त सिताराम खिलारी, ॲड. माणिक मोरे, श्रीमती निर्मला काटे, ॲड. सतीश पा., ॲड. माधवेश्वरी म्हसे, प्राचार्य एल. एस. मतकर, स्पर्धेचे समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, डॉ. अतुल मोरे व डॉ. बी. डी. पांढरे उपस्थित होते.

न्या. देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत कायद्याचे बारकावे आणि सखोल संकल्पना यांवर आधारित प्रश्न विचारले. यामुळे विद्यार्थ्यांना चिंतनशील बनण्यास तसेच वाचनाची सवय जोपासण्यास प्रोत्साहन मिळाले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पा. म्हणाल्या की, कै. एस. बी. म्हसे पा. यांनी विधी क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करून ग्रामीण भागातील वकिलांसाठी आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी या उद्देशाने संस्थेने त्यांच्या नावाने अभिरूप न्यायालय स्पर्धा सुरू केली आहे. यावर्षी स्पर्धेत राज्यभरातून उच्चांकी १९ संघांनी सहभाग नोंदविला असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल मोरे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. वंदना शिरसाट यांनी करून दिली, सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे व प्रा. डॉ. रामेश्वर दुसंगे यांनी केले. प्रा. विजयकुमार शिंदे यांनी आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम पारितोषिक : लिंभारे वैष्णवी सतीश, मुळे पद्मजा गिरीश, व वरकड यश. एम पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर., द्वितीय पारितोषिक : अभिषेक करांडे, शाहिद पठाण व विकास जराड – न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर., उत्तेजनार्थ पारितोषिक : मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज, पुणे.

उत्कृष्ट वकील : अभिषेक करांडे – न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर.

उत्कृष्ट महिला वकील : मुळे पद्मजा गिरीश – एम. पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर.

उत्कृष्ट मेमोरियल : शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज, पुणे.

# दास नवमी निमित्त श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळातर्फे सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर येथे सामूहिक मनाचे श्लोक पठण उपक्रमाचे आयोजन



नगर – दास नवमी निमित्त श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाने आपल्या चारही विभागाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सामूहिक मनाचे श्लोक पठण उपक्रमाचे आयोजन केले. सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिर येथे दास नवमीचे औचित्य साधून भक्तिमय व संस्कारक्षम वातावरणात विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समर्थ रामदास स्वामी रचित मनाचे श्लोक सामूहिकरित्या म्हटले. विद्यार्थ्यांच्या एकमुखी श्लोक पठणाने संपूर्ण शालेय परिसर अध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला. या कार्यक्रमास शाळेचेशालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, मुख्याध्यापक अजय महाजन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे, शिक्षकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते.

श्रीपाद कुलकर्णी यांनी समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचे महत्त्व विषद करून मनाचे श्लोक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिस्त, संयम, आत्मविश्वास व चारित्र्यनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरतात, असे मत व्यक्त केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात अशा संस्कारक्षम उपक्रमांची नितांत गरज असून शाळा अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व शिस्तबद्ध सादरीकरण हे या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक जाणीव निर्माण होऊन संस्कारांचे महत्त्व अधोरेखित झाले

शाळेचे मुख्याध्यापक यांनी दासनवमी निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केल्याचे सांगितले. पाठांतर निबंध हस्ताक्षर चित्रकला वकृत्व सूर्य नमस्कार या स्पर्धांचे आयोजन केले गेले. शहरातील बहुसंख्य शाळांनी यात सहभाग घेतला यशस्वी विद्यार्थ्याना दासनवमी दिवशी बक्षीस वितरण होणार आहे तसेच श्री अजेय बुवा रामदासी यांचे प्रवचन श्री समर्थ प्रशाला सावेडी येथे ११ फेब्रुवारी संध्याकाळी ५ वाजता आयोजित केले आहे.

समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचे महत्त्व विषद करून मनाचे श्लोक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिस्त, संयम, आत्मविश्वास व चारित्र्यनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरतात, असे मत व्यक्त केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात अशा संस्कारक्षम उपक्रमांची नितांत गरज असून शाळा अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा सहभाग व शिस्तबद्ध सादरीकरण हे या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक जाणीव निर्माण होऊन संस्कारांचे महत्त्व अधोरेखित झाले.

# जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदी नंदिनीताई सोनाळे यांची फेरनिवड



नगर – जिजाऊ ब्रिगेडच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी (उत्तर व दक्षिण) शिवमती नंदिनीताई सोनाळे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. मागील वर्षभरात त्यांनी केलेल्या भरीव व प्रभावी संघटन कार्याची दखल घेत जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश कार्यकारिणीने संपूर्ण जिल्ह्याची जबाबदारी पुन्हा त्यांच्या खांद्यावर सोपवली आहे.

या निवडीचे अधिकृत पत्र जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमाताई बोके यांच्या सहीने प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती वर्षाताई माने यांनी नंदिनीताई सोनाळे यांना प्रदान केले.

निवडीनंतर बोलताना नवनियुक्त जिल्हाध्यक्ष नंदिनीताई सोनाळे म्हणाल्या की, येत्या वर्षभरामध्ये संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात जिजाऊ ब्रिगेडची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचे ध्येय ठेवून काम करणार आहे. प्रदेश कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली तेरा ही तालुक्यांमध्ये संघटना जोमाने उभी केली जाईल.

मागील वर्षभरात जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यांचे, अहिल्यानगर जिल्ह्यातील माजी जिल्हाध्यक्षांचे, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी व हितचिंतक कार्यकर्ते तसेच संभाजी ब्रिगेडच्या खंबीर पाठिंब्यामुळे काही तालुक्यांमध्ये प्रभावी संघटन उभारणी शक्य झाली, असेही त्यांनी नमूद केले. पुढील काळात मराठा सेवा संघ उत्तर व दक्षिण, संभाजी ब्रिगेड, मराठा नागरी पतसंस्था तसेच जिजाऊ ब्रिगेडचे सर्व आजी-माजी सदस्य यांचे सहकार्य मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यकाळात मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे, मराठा नागरी पतसंस्थेचे चेअरमन इंजि. विजयकुमार ठुबे, जिजाऊ ब्रिगेडच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुजाताताई ठुबे, मराठा सेवा संघाचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रवीण दहातोंडे, उत्तर जिल्हाध्यक्ष दिनेश लव्हाटे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेंश परकाळे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश कार्याध्यक्ष श्रीमती राजश्रीताई शितोळे, माजी जिल्हाध्यक्ष संपुर्णाताई सावंत तसेच सर्व तालुका कार्यकारिणींचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

# १९ ते २५ वयोगटात विवाह व ३ अपत्यांचा सल्ला आचरणात आणावा : सौ. स्वातीताई सिरसुल



नगर – ३० ते ३५ वर्षे ओलांडूनही आजची तरुण पिढी लग्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे पारंपरिक कुटुंब व्यवस्था धोक्यात आली असून त्याचे दूरगामी दुष्परिणाम समाज व राष्ट्र उभारणीवर होणार आहेत, अशी स्पष्ट भूमिका भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी व्यक्त केली आहे.

नुकत्याच मुंबई येथे संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'संघ परिवाराची १०० वर्षे – नवीन क्षितिज' या विषयावरील कार्यक्रमात बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी आजच्या तरुण पिढीने १९ ते २५ या वयोगटात विवाह करावा आणि तीन अपत्यांना जन्म द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सरसंघचालकांनी मांडलेले हे विचार व दिलेला सल्ला भविष्याच्या दृष्टीने हिंदू राष्ट्र निर्मितीसाठी अत्यंत मौल्यवान असून आजच्या पिढीने तो आपल्या जीवनात प्रत्यक्षात आचरणात आणावा, अशी अपेक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी व्यक्त केली.

सौ. सिरसुल पुढे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा मंत्र महिलांच्या सर्वांगीण विकास व प्रगतीसाठी दिला होता. शिक्षणाचा उद्देश ज्ञानप्राप्ती हा होता. मात्र सुरुवातीच्या काळात किती शिक्षण घ्यावे आणि कशासाठी घ्यावे, याबाबत फारशी स्पष्टता नव्हती. आज मात्र शिक्षणाचा उपयोग ज्ञान मिळवण्यापेक्षा व्यवसायाच्या दृष्टिकोनातून आणि अधिक पैसे मिळवण्याकडे झुकलेला दिसून येत आहे.

डिग्री व इतर उच्च पदव्या मिळवण्यासाठी तरुण वर्गाचे आयुष्यातील २० ते २५ वर्षे खर्ची पडत असून त्यानंतर नोकरी मिळवण्यासाठी आणखी काही वर्षे जात आहेत. परिणामी आजचे तरुण-तरुणी लग्नाविना थेट ३० ते ३५ वर्षांच्या पलीकडे पोहोचत आहेत. याचा दुष्परिणाम पर्यायाने राष्ट्र उभारणीवरही होणार आहे. सध्या तरुणांमध्ये बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. उच्च पदव्या घेतलेला तरुण वर्ग नोकरी व्यतिरिक्त इतर हलकी किंवा कमी दर्जाची कामे करण्यास नकार देताना दिसतो. 'रिकामे बसून खाईन, पण छोट्या व हलक्या दर्जाचे काम करणार नाही' अशी न्यूनगंडाची मानसिकता त्यांच्यात निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

भविष्यात अपत्यांची संख्या कमी झाल्यास काका, काकू, भाऊ, बहीण, मामा, मावशी अशी नातेसंबंधांची साखळीच नष्ट होण्याची भीती असल्याचेही त्यांनी व्यक्त केले. या सर्व पार्श्वभूमीवर आजच्या पिढीने वयाच्या १९ ते २५ वर्षांच्या आत विवाह करावा आणि तीनपेक्षा जास्त अपत्य असावीत, असा सरसंघचालक मोहन भागवत यांनी दिलेला उपदेश प्रत्यक्षात आचरणात आणावा, अशी मागणी सौ. सिरसुल यांनी केली आहे.



नगरी ग्लोबल फाऊंडेशनच्या वतीने भाई सथ्था नाईट हायस्कूलला आर.ओ. प्लांट देण्यात आला आहे. ते बसविण्यासाठी इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला आर्थिक मदत दिली.

# कष्टातून शिक्षण घेणारे विद्यार्थीच उद्याचे यशस्वी नागरिक

### डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा, करिअर मार्गदर्शन

नगर – रात्र शाळेत सहकार्याची भावना व मैत्रीपूर्ण वातावरणात शिक्षण दिले जाते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवण्याचे काम करत आहेत. उपजीविका भागवून शिक्षणाची भूक भागवणारे विद्यार्थी अत्यंत कष्टाने शिकत असून 'शिकला तोच जीवनात घडला' हे येथे खऱ्या अर्थाने अनुभवायला मिळते. रात्र शाळेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन करावे, तसेच अर्धवट शिक्षण सोडलेल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी रात्र शाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन अध्यक्षीय भाषणात डॉ. पारस कोठारी यांनी केले.

प्रपंचासाठी उद्योग-व्यवसाय व नोकरी करत अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी धडपड करणाऱ्या हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूलमधील इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. यासोबतच त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेचे माजी विद्यार्थी असलेले पै. महेश लोंढे नगरसेवकपदी निवडून आल्याबद्दल तसेच सिव्हिल इंजिनिअर हनुमान डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला.

पेमराज सारडा ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास रात्र शाळेचे प्राचार्य सुनील सुसरे, ज्येष्ठ शिक्षक गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत, शरद पवार, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, उज्वला साठे, बाळू गोरडे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अशोक शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अनुराधा दरेकर, वृषाली साताळकर, वैशाली दुराफे, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. रात्र शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात शरद पवार यांनी शाळेच्या वतीने उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, तसेच मासूम संस्थेच्या माध्यमातून मिळणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची माहिती दिली. यावेळी दहावी व बारावीनंतर करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळेत सहकार्याची भावना व मैत्रीपूर्ण वातावरणात शिक्षण दिले जाते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवण्याचे काम करत आहेत. उपजीविका भागवून शिक्षणाची भूक भागवणारे विद्यार्थी अत्यंत कष्टाने शिकत असून 'शिकला तोच जीवनात घडला' हे येथे खऱ्या अर्थाने अनुभवायला मिळते. रात्र शाळेतून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन करावे, तसेच अर्धवट शिक्षण सोडलेल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांनी रात्र शाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक महेश लोंढे यांनी सांगितले की, रात्र शाळेतूनच सामाजिक कार्याची ऊर्जा मिळाली. महिला व युवकांनी राजकारणात सक्रिय सहभाग घ्यावा, त्यामुळे विकासाला योग्य दिशा मिळेल.

सिव्हिल इंजिनिअर हनुमान डोंगरे म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षण घेऊन मी यशस्वी उद्योजक होऊ शकलो. या शाळेने मला दिशा दिली असून गुरुजनांचे उपकार कधीही फेडता येणार नाहीत.

यावेळी रात्र शाळेच्या विद्यमान चेअरमन ज्योती कुलकर्णी यांनी दूरध्वनीद्वारे विद्यार्थ्यांना शुभेच्छा संदेश दिला.

विद्यार्थ्यांच्या यशासाठी शाळेत नियमित वर्गांसह रविवारीही विशेष वर्ग घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष दिले जात असून तळमळीने शिक्षण दिले जाते. शिक्षक आई-वडिलांप्रमाणे माया लावत असल्याने अनेकांच्या डोळ्यांत यावेळी भावनांचे अश्रू तरळले. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून जीवनाला आकार देण्यासाठी आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी पायल पोटे, साक्षी निमसे, प्रतिभा जाधव, वंदना मलठणकर, सुषमा उमाप, वैष्णवी देशमुख, अंजली नांगरे, पूजा साळवे, सिद्धी हुचे, मनोज साठे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून रात्र शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माया पाटोळे, अंजली नांगरे व रेश्मा गांधी यांनी केले. ज्येष्ठ शिक्षक गजेंद्र गाडगीळ यांनी आभार मानले.

# श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या मुलींचे यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या नोव्हेंबर २०२५ या सत्रात परीक्षेमध्ये श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या मुलींनी यश मिळवले आहे.

प्रारंभिक परीक्षेत गौरी कवाष्टे, ओवी कहाने कहाने, ओजस्विता लटांबाळे, गौरी सरोदे, यज्ञा शिंदे, ओवी कौतुकर, श्रेया जाधव प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. तर प्रणिती तोरडमल ही द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. प्रवेशिका प्रथम परीक्षेत जयमाला गायकवाड प्रथम श्रेणीत तर प्रवेशिका पूर्ण परीक्षेत काव्या भंडारी, स्वरा चोपडा व दिशा विधाते या मुलींनी प्रथम श्रेणी तर ईश्वरी भापकर या विद्यार्थिनीने विशेष योग्यता मिळवली आहे. मध्यमा पूर्ण परीक्षेत चैत्राली क्षीरसागर, राजेश्वरी खडके, वैदेही रोकडे या मुली चांगल्या गुणांनी पास झाल्या आहेत. या सर्व मुलींना विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी सौ. वर्षा पंडित यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

विद्यालयाचे सहसंचालक चंद्रकांत पंडित यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

# धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस कारावास

नगर – आरोपी नितीन पांडूरंग वाबळे, रा. नागेश्वर विद्यालया जवळ, पाटस, ता. दौंड जिल्हा पुणे याने फिर्यादी यांच्याकडून हातउसनी रक्कम घेतली होती. सदर रक्कमेच्या बदल्यात आरोपीने फिर्यादीस आरोपीचे खाते असलेल्या बँकेचा धनादेश दिलेला होता.

सदरचा धनादेश फिर्यादी यांनी त्यांच्या बँकेत वटविण्यासाठी भरला असता सदरचा धनादेश वटला नाही व फंडस इनसफिशियंट असा शेरा मारुन परत आला.

त्यामुळे फिर्यादी सचिन भगवंत खोडदे, रा. वाकोडी फाटा, ता. जि. अहिल्यानगर यांनी त्यांच्या विरुध्द अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट नंबर १० यांच्या कोर्टात नि. इं ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये साक्षीपुरावे घेवून कोर्टाने आरोपीस दोषी धरुन आरोपीस एक महिना सशस्त्र कारावास व नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये १,००,००० फिर्यादी यांना एक महिन्याच्या आत द्यावेत, सदरची रक्कम न दिल्यास आरोपीस पुन्हा दोन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.

फिर्यादीतर्फे ॲड. भाऊसाहेब मुरलीधर घुले पा. यांनी काम पाहिले त्यांना ॲड. ए. एम. गर्जे व आर. बी. ठवरे अहिल्यानगर यांनी मदत केली.

# दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे पाणलोट विकास व व्यवस्थानावर अहिल्यानगरमध्ये १३-१४ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्रातर्फे १३-१४ फेब्रुवारी रोजी पाणलोट विकास व व्यवस्थापन कार्यक्रम: निरीक्षण व मूल्यमापन या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आयोजित या अखिल भारतीय परिसंवादाचे उद्घाटन १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते होणार असून, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व आदर्श गाव हिवरेबाजारचे सरपंच व महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवस चालणाऱ्या परिसंवादाला अमेरिकेच्या प्रसिद्ध टेक्सास ए ॲण्ड एम विद्यापीठातील जागतिक कीर्तीचे जलतज्ञ व शास्त्रज्ञ डॉ. व्ही. पी. सिंह उपस्थित राहणार असून परिसंवादातील सहभागी व्यक्तींना मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात पाणलोट संबधित चार मुख्य थीम अंतर्गत अकरा विषयांवर राज्यातून व परराज्यांतून आलेल्या सुमारे चाळीस शोध निबंधांचे सादरीकरण होणार आहे, अशी माहिती केंद्राचे अध्यक्ष, अभियंता भारतभूषण भागवत, मानद सचिव डॉ. दीपक विधाते व परिसंवादाचे निमंत्रक डॉ. अतुल अत्रे यांनी दिली.

# जोश

## आता व्हॉट्सअॅप सशुल्क ?

**अॅप वर्ल्ड**

व्हॉट्सअॅप वापरण्यासाठी लवकरच पैसे भरावे लागू शकतात. कारण कंपनी सध्या सबस्क्रिप्शन मॉडेलवर काम करत आहे. गेल्या वर्षी 'मेटा'ने व्हॉट्सपच्या स्टेटस आणि चॅनेल विभागात जाहिरातींची चाचणी सुरू केली. या निर्णयावर अनेकांकडून टीका झाली; परंतु कंपनीने टीकेला जुमानले नाही.

'व्हॉट्सअॅप' व्हर्जन २.२६.३.९ एचव्हीएम' या अॅपच्या कोडमध्ये काही नवीन स्ट्रिंग आढळल्या आहेत. त्या स्टेटस आणि चॅनेलवरून जाहिराती काढून टाकण्यासाठी डिझाइन केलेल्या सबस्क्रिप्शनबद्दल माहिती देतात. याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी कंपनी ही युजर्ससाठी जाहिरातमुक्त योजनेच्या कल्पनेवर काम करत आहे, हे रिपोर्ट्सवरून स्पष्ट होते. त्यामुळे आता 'व्हॉट्सअॅप' वापरताना जाहिरातींचा मारा नको असेल तर ग्राहकांना पैसे भरावे लागतील. पैसे भरले नाहीत तर वारंवार जाहिरती बघाव्या लागू शकतात.

सबस्क्रिप्शनची किंमत किती असेल, हे अद्याप उघड झालेले नाही. तसेच जाहिराती काढून टाकण्याव्यतिरिक्त, त्यात कोणते फीचर्स असतील आणि नवे व्हर्जन युजर्ससाठी कधी उपलब्ध होईल, याचीही माहिती समोर आलेली नाही; मात्र 'मीडिया रिपोर्ट्स'वरून हे स्पष्टपणे दिसून येते, की सबस्क्रिप्शन केवळ स्टेटस आणि चॅनेलवर प्रदर्शित होणाऱ्या जाहिरातींवर केंद्रित आहे. याचा अर्थ तुम्हाला या दोघांशिवाय इतर कुठेही जाहिराती दिसणार नाहीत.

## शेतीत शोधली कारकिर्द

**अचिव्हर**

अवघ्या सात महिन्यांची असतानाच वडिलांनी आईसह तिला सोडून दिलं. आयुष्याच्या सुरुवातीलाच आलेला हा धक्का कुठल्याही मुलीला मोडून काढणारा ठरू शकतो; मात्र अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यातल्या करजगाव गावात राहणाऱ्या भारती पोहोरकरनं परिस्थितीसमोर कधीही गुडघे टेकले नाहीत.

आईसोबत आजोळी आलेल्या भारतीला आजी शांताबाई किसनराव भोगे आणि आजोबा किसनराव नागोजी भोगे यांनी मायेची उब दिली. त्यांच्याकडे केवळ एक एकर शेती होती. या मर्यादित साधनांवर त्यांनी मुलगी आणि नातीचं संगोपन केलं. गरिबी, अडचणी आणि संघर्ष असतानाही कष्ट आणि संस्कारांच्या बळावर त्यांनी भारतीचं भविष्य घडवलं. आज आजी-आजोबा हयात नसले, तरी त्यांनी दिलेली शेती आणि मूल्यं तिच्या यशाचा पाया ठरली आहेत. भारतीनं अमरावती शहरात वाणिज्य शाखेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं. पुढे स्पर्धा परीक्षांचा प्रयत्न केला; मात्र अपेक्षित यश मिळालं नाही. काही काळ उपजीविकेसाठी तिनं पेट्रोल पंपावर नोकरीही केली, तरीही लहानपणापासून शेतीशी असलेलं नातं कधीच तुटलं नाही.

अपयशानंतरही खचून न जाता भारतीनं शेतीकडे वळण्याचा ठाम निर्णय घेतला. 'या शेतातूनच माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली,' असं ती सांगते. सुरुवातीला एक एकर शेतीत भाजीपाला लागवड करून तिनं स्वतःवर विश्वास निर्माण केला. भाजीपाल्यातून मिळालेल्या उत्पन्नानंतर चांदूरबाजार कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि अनुभवी शेतकऱ्यांच्या सल्ल्याने भारतीनं संत्री लागवडीचा धाडसी निर्णय घेतला. अवघ्या तीन-चार वर्षांत एक एकर शेतात १४० संत्र्याची झाडं उभी राहिली. सुरुवातीच्या काळात मिरची व कांदा आंतरपीक घेत खर्च भागवण्यात आला. सेंद्रिय खत, जैविक कीटकनाशकांचा वापर करून जमिनीची सुपीकता जपली.

योग्य नियोजन, वेळेवर फवारणी आणि मेहनतीमुळे या वर्षी मृग बहार धरलेल्या संत्रा बागेचं उत्पादन थेट सात लाख रुपयांना विकलं गेलं. ही बाग केवळ आर्थिक उत्पन्न देणारी नाही, तर आई-लेकीसाठी आत्मविश्वास देणारी ठरली आहे.

महिला शेतकरी म्हणून काम करताना अनेक अडचणी आल्या. वेळेवर मजूर न मिळाल्यामुळे पाणी देणं, खत टाकणं, फवारणी यांसारखी बहुतेक कामं भारतीनं स्वतः आईसोबत केली. आवश्यक तेवढ्याच कामांसाठी मजूर लावले.





## महाराष्ट्रातील मालदीवला जावेच!

**भटकंती**

सध्या अनेकजण सुट्टीसाठी मालदीवला जाण्याचा प्लॅन करतात; पण खर्च मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अनेकजण जाणे टाळतात. तुम्ही सर्वात स्वस्तामध्ये मालदीवचा आनंद घेऊ शकता.

सर्वात कमी खर्चात मालदीवचा आनंद अनुभवायचा असेल तर महाराष्ट्रातील एका ठिकाणाबद्दल सांगणार आहोत. तिथे गेल्यावर मालदीव सारखा नजारा पाहायला मिळेल. कोकणातील तारकर्ली बीचवरील पाणी निळ्या रंगाचे असल्यामुळे आणि कमी गर्दी आणि तेथील सौंदर्य हे मालदीवप्रमाणे असल्याने अनेक लोक येथे येतात. तारकर्ली बीच कोकणातील सुंदर आणि स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे. येथे वेगवेगळ्या प्रकारचे मासे पाहायला मिळतात. त्यासोबत तुम्ही येथे बोटिंगसह सूर्योदय आणि सूर्यास्त व्यवस्थित पाहू शकता. शांत आणि कमी गर्दी असणारे हे ठिकाण कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी एकदम खास आहे.



## व्हा स्थापत्य अभियंता

**रोजगारवाटा**

सिव्हिल इंजिनीअरींग अत्यंत गतिमान, प्रतिष्ठित आणि भविष्यकालीन संधींनी भरलेले करिअर क्षेत्र असून आधुनिक जगाच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावते. रस्ते, पूल, इमारती, धरणे, विमानतळ आणि रेल्वे व्यवस्था या सर्व पायाभूत सुविधांमागे सिव्हिल इंजिनीअरचे ज्ञान, कल्पकता आणि मेहनत असते. सिव्हिल इंजिनीअरींगमध्ये पायाभूत सुविधांचे नियोजन, डिझाइन, बांधकाम आणि देखभाल यांचा समावेश होतो. ते दैनंदिन जीवन आणि आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक आहे. प्रत्यक्ष कामात रस, सर्जनशील विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सिव्हिल इंजिनीअरींग हे समाधानकारक आणि अर्थपूर्ण करिअर ठरते.

सिव्हिल इंजिनीअरींगमध्ये सरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. नोकरीतील स्थिरता, सामाजिक प्रतिष्ठा आणि सुरक्षित भविष्य यामुळे अनेक विद्यार्थी सरकारी नोकऱ्यांना प्राधान्य देतात. सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सिंचन विभाग, महानगरपालिका आणि विविध सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये सिव्हिल इंजिनीअर कार्यरत असतात. यूपीएससी इंजिनीअरींग सेवा परीक्षा, गेट, एसएससी-जेई आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांद्वारे कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि प्रकल्प अभियंता अशा पदांवर नियुक्ती मिळते. या नोकऱ्यांमुळे अभियंत्यांना देशाच्या पायाभूत विकासात थेट योगदान देण्याची संधी मिळते. खासगी क्षेत्रात स्थापत्य अभियंत्यांसाठी अधिक वेगाने वाढणाऱ्या आणि आकर्षक संधी उपलब्ध आहेत. बांधकाम कंपन्या, पायाभूत सुविधा विकास संस्था, रिअल इस्टेट कंपन्या, सल्लागार संस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये सिव्हिल इंजिनीअर काम करू शकतात. साइट इंजिनीअर, स्ट्रक्चरल इंजिनीअर, प्लॅनिंग इंजिनीअर, क्वांटिटी सर्व्हेअर, गुणवत्ता नियंत्रण अभियंता आणि प्रकल्प व्यवस्थापक अशी विविध पदे उपलब्ध आहेत. नामांकित कंपन्या उच्च पगार, जलद करिअर प्रगती आणि मोठ्या प्रकल्पांवर काम करण्याची संधी देतात. याशिवाय सिव्हिल इंजिनीअरींगमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरही मोठ्या संधी उपलब्ध आहेत. अनुभवी आणि कुशल सिव्हिल इंजिनीअरना मध्यपूर्व देश, युरोप, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि आशियातील विविध देशांमध्ये मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळते. मेट्रो प्रकल्प, महामार्ग, उंच इमारती, औद्योगिक प्रकल्प आणि स्मार्ट सिटी विकासासाठी सिव्हिल इंजिनीअरची जागतिक स्तरावर मोठी मागणी आहे. आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमुळे अभियंत्यांना उच्च पगार, जागतिक अनुभव आणि व्यावसायिक कौशल्यांचा विकास करता येतो. नोकरीव्यतिरिक्त सिव्हिल इंजिनीअरींगमुळे उद्योजकता आणि व्यवसाय करण्याचेही अनेक मार्ग खुले होतात. सिव्हिल इंजिनीअर स्वतःची बांधकाम कंपनी सुरू करू शकतात. सरकारी ठेकेदार होऊ शकतात, सल्लागार सेवा देऊ शकतात किंवा रिअल इस्टेट डेव्हलपर म्हणून यशस्वी कारकीर्द घडवू शकतात. एकूणच, सिव्हिल इंजिनीअरींग केवळ एक व्यवसाय नसून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल भविष्य घडवण्याची संधी देणारे करिअर आहे.

## रंगवापराच्या भिंती तुटताना

**फॅशन पॅशन**

पुरुष 'फॅशन'च्या बाबतीतले निर्णय घेण्याच्या बाबतीत मोठी रिस्क घेत नाहीत. तुम्हाला नवनवे रंग वापरायचे असतील तर प्रत्येक नवा रंग वापरताना तुम्हाला एक धाडस करावे लागते. हा रंग आपण वापरला आणि तो आपल्याला अजिबात चांगला दिसत नसेल तरी आपला आत्मविश्वास जराही डळमळीत न होता तो रंग अंगावर वागवत वावरणे हे मोठे धैर्यचेच आहे. एकदा विविध रंग वापरायला लागलो, की रंगवापराच्या भिंती तुटतात आणि कितीतरी रंगीबेरंगी पर्याय आयुष्यात उपलब्ध होतात.

रंगांच्या बाबतीत आहे, तेच कपड्यांचे पॅटर्न आणि केशरचनेच्या बाबतीतही. सुरुवातीचे धाडस, नव्या कल्पनांना खुलेपणाने सामोरे जाण्याची दिलेरी, चांगले दिसण्याचे किंवा किमान वेगळे दिसण्याचे प्रयत्न जगण्याचे कितीतरी नवे, लोभस पर्याय खुले करतात. नवनवीन फॅशनचा आग्रह आणि वेगळे दिसण्याचे धाडस माणूस करायला लागतो तसतसा तो नवा होत जातो. नुसते कपडे किंवा हेअर स्टाईल बदलत नसते. त्याबरोबरच आतला माणूसही बदलत असतो. जुनाट विचार, कालबाह्य परंपरा आणि रूढींची अडगळ सांभाळण्याच्या लायकीची आहे, असे समजणारे आणि त्याच्यामागे लागलेले लोक स्वतःही नव्या फॅशनचे काही घालत नाहीत आणि दुसऱ्याने फॅशनेबल दिसायलाही विरोध करतात, तो त्यामुळेच. आणि ते मुख्यतः पुरुषच असतात, हेही स्वाभाविकच.

शेवटी 'फॅशन' म्हणजे तरी काय?

आपण कसे दिसायला पाहिजे याबद्दलचा आपण स्वतः घेतलेला निर्णय.

आपण कसे दिसायला हवे याचा निर्णय घेण्याचे धाडस आले की कसे असायला हवे, याचेही धाडस करता येते. मग कसा विचार करायला हवा, याचेही धाडस करता येते. जिथे कॉपी नाही, संपूर्ण नवीन आहे- ती म्हणजे फॅशन. मग ती दिसण्याची असो, असण्याची असो, किंवा विचार करण्याच्या पद्धतीची असो; ती फॅशन वेगळी आणि नवी असणारच! सगळे जग बदलते आहे. जगातल्या अनेक देशांनी आपली कवाडे खुली केली आहेत. भूतकाळाच्या बेड्या ज्याच्या पायात नाही आणि भविष्यकाळाची फिकीर नाही असा ज्ञानाचा, कल्पनांचा खुला प्रवाह एकमेकांकडे वाहतो आहे. या खुल्या, वाहणाऱ्या हमरस्त्यावर वळू बनून काही जुनाट लोक देशोदेशी बसलेत. पन्नास वर्षांनी आपण तेव्हाच्या रंगीबेरंगी कपडे घालणाऱ्या, टवटवीत, ताजा विचार करणाऱ्या मुलांबरोबर बोलत असू, आणि आपण त्यांना सांगू, की नव्या, वाहत्या विचारांच्या रस्त्यात वळू बनून बसण्याचा जेव्हा माझ्या आयुष्याने मला पर्याय दिला होता तेव्हा तो मी नाकारला होता.



## ऑनलाईन शिका मार्केटिंगचे फंडे

**अचिव्हर**


सध्या मार्केटिंगच्या क्षेत्रात बऱ्याच संधी आहेत. या क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांना सतत अपटूडेट असावं लागतं. मार्केटिंगमध्ये करिअर करायचं असेल किंवा करत असाल तर गूगलवरचे काही ऑनलाईन अभ्यासक्रम उपयोगी पडू शकतात.

* 'अंडरस्टॅंड कस्टमर नीड्स अॅंड बिहेवियर' हा अभ्यासक्रम ग्राहकांच्या प्राथमिक गरजा आणि त्यांच्या ऑनलाईन वागणुकीची माहिती देतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही ग्राहकांना अधिक चांगल्या प्रकारे ओळखू शकता.

* 'मेक शुअर कस्टमर्स फाईंड यू ऑनलाईन' या अभ्यासक्रमात ग्राहकांना कसं जोडायचं, त्यांच्याशी कसा संपर्क साधायचा याचे धडे दिले जातात.

* 'फंडामेंटल्स ऑफ डिजिटल मार्केटिंग' या अभ्यासक्रमात डिजिटल मार्केटिंगशी संबंधित प्राथमिक माहिती दिली जाते. डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून व्यवसायवृद्धी कशी करायची हे या अभ्यासक्रमातून समजून घेता येतं.

* 'प्रमोट अ बिझनेस विथ ऑनलाईन अॅडव्हरटायझिंग' हा अभ्यासक्रम खूपच अनोखा आहे. कोणताही व्यवसाय ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर कसा प्रमोट केला जातो हे आपण या अभ्यासक्रमातून शिकू शकतो.



## स्कील अपग्रेडची संधी

**स्किल डेव्हलपमेंट**

आजच्या स्पर्धात्मक 'जॉब मार्केट'मध्ये नोकरी मिळवणे किंवा पगारवाढ करणे सोपे नाही; पण केंद्र सरकारच्या 'स्वयम' पोर्टलवरून मोफत ऑनलाइन कोर्सेस करून स्किल्स अपग्रेड करू शकता. विशेषतः आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि डिझाइनशी संबंधित कोर्सेस घेऊन तुम्ही लवकरच चांगली नोकरी मिळवू शकता. फक्त पदवीपेक्षा प्रमाणपत्रे आणि स्किल बेस्ड अभ्यासक्रम नोकरीसाठी जास्त फायद्याचे ठरतात.

'स्वयम' हा भारत सरकारचा मोफत शिक्षण प्लॅटफॉर्म आहे. इथे इयत्ता नववीपासून पदव्युत्तर स्तरापर्यंतचे हजारो अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व कोर्सेस आयआयटी, आयआयएम आणि देशातील एक हजारांहून अधिक निवडक प्राध्यापकांनी तयार केलेले आहेत. व्हिडीओ लेक्चर्स, डाउनलोड करण्यायोग्य नोट्स, क्विझ आणि स्वयम मूल्यमापनाच्या सुविधा इथे मिळतात. सर्व कोर्सेस मोफत आहेत. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र हवे असेल (जे नोकरी किंवा पुढील शिक्षणासाठी उपयोगी पडते), तर प्रॉक्टर्ड परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा नाममात्र शुल्कात (शंभर ते एक हजार रुपये) होते पण शिकणे पूर्णपणे विनामूल्य आहे.

हे कोर्सेस करून तुम्ही 'एआय' स्किल्स शिकू शकता. या स्किल्सना आज आयटी, मार्केटिंग, एचआर, डिझाइन आणि अनेक क्षेत्रांत खूप मागणी आहेत. नोकरी शोधणाऱ्यांसाठी किंवा सध्याच्या नोकरीत प्रगती हवी असणाऱ्यांसाठी हे उत्तम संधी आहे.

कोर्स कसे सुरू कराल?

फक्त 'स्वयम डॉट जीओव्ही डॉट इन'वर जा,

'ऑल कोर्सेस'वर क्लिक करा

'एआय' किंवा डिझाइन फिल्डनुसार फिल्टर करून आवडता कोर्स निवडा.




## 'व्हॉट्सअॅप'मध्ये दिसणार जुने संदर्भ

**व्हॉट्स न्यू?**

'व्हॉट्सअॅप' नेहमीच युजरचा अनुभव चांगला करण्याचा प्रयत्न करत असते. आता एक नवीन फीचर लोकांच्या पसंतीस उतरत आहे. पूर्वी ' व्हॉट्सअॅप' ग्रुपमध्ये एखादा नवीन मेंबर अॅड झाला की त्याला कोरे चॅट दिसत होते. जुनी चर्चा काय झाली हे त्याला समजत नसे; मात्र नवीन फीचरमुळे आता नवीन सदस्यांना ग्रुपमध्ये अॅड होण्यापूर्वीचे मेसेजेस पाहता येणार आहेत. त्यामुळे त्यांना संवादाचा संदर्भ समजणे सोपे होईल

या सुविधेअंतर्गत नवीन सदस्याला ग्रुपमध्ये येण्यापूर्वीच्या २४ तासांपर्यंतची चॅट हिस्ट्री वाचता येईल. यामध्ये केवळ कंटेंट किंवा मेसेजच नाही, तर शेअर केलेले फोटो आणि फाइल्सदेखील पाहता येतील. यामुळे ग्रुपमध्ये नेमकी काय चर्चा सुरू होती, हे जाणून घेण्यासाठी इतरांना विचारण्याची गरज पडणार नाही. हे फीचर पूर्णपणे ग्रुप अॅडमिनच्या नियंत्रणात आहे. अॅडमिनला 'ग्रुप सेटिंग्ज'मध्ये जाऊन हे फीचर कधीही सुरू किंवा बंद करता येते. अॅडमिनने हे फीचर सुरू ठेवले, तरच नवीन मेंबर्सना मागील मेसेजेस दिसतील. त्यामुळे ग्रुपची सुरक्षा आणि नियंत्रण अॅडमिनकडेच राहील.

'व्हॉट्सअॅप'ने हे फीचर आणताना वापरकर्त्यांच्या गोपनीयतेची पूर्ण काळजी घेतली आहे. नवीन मेंबर्सना जुने चॅट दिसत असले तरी व्हॉट्सअॅपचे 'एंड-टू-एंड एन्क्रिप्शन' तंत्रज्ञान कायम आहे. म्हणजेच केवळ ग्रुपमधील लोकच ते मेसेजेस वाचू शकतात आणि बाहेरील कोणालाही किंवा ' व्हॉट्सअॅप'लाही ते वाचता येत नाहीत.

